म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९३८४

१०५६ ९३८४

REFBK-0009394
REFBK-0009394

2

দা·সং·
৫২৫৪

# अरुणा

कवि

भालचंद्र खांडेकर

प्रस्तावना

प्रा. भवानीशंकर पंडित

किंमत

दोन रुपये फक्त

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0009394
REFBK-0009394

● सर्व हक्क कवीकडे ● मुखपृष्ठ चित्रकार : म. ग. खांडेकर

प्रकाशक : पंडित अनंत कुलकर्णी, कुलकर्णी ग्रंथागार, १८६ शनिवार, पुणें २.
मुद्रक : न. शं. कुलकर्णी, टीचर्स प्रिंटिंग प्रेस, ७७ शनिवार, पुणें २, करितां.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३५४
22073 वि: ३१०५
3325 नों: दि: ८।८।५८

# प्रभाती

श्री. भालचंद्र खांडेकर यांच्याशीं माझा केवळ पत्र-परिचय आहे. असें असतांना सुद्धां ' अरुणा ' या त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहास प्रस्तावना जोडण्यास मी सिद्ध झालों याचें कारण माझी कविताविषयक ओढ होय. तिनें मला स्वस्थ बसूं दिलें नाहीं. वस्तुतः आधुनिक मराठी कवितेच्या मुलखांत श्री. खांडेकर हे कांहीं नवखे मुशाफिर नाहींत. " चंद्रप्रकाश " हा त्यांचा पहिला कवितासंग्रह सुमारें पांच वर्षांपूर्वीच प्रकाशांत आला आहे. तो प्रकाशांत येण्यापूर्वीपासून दहा-बारा वर्षं त्यांचें कवितालेखन चालूं होतें. म्हणजे कवितेच्या दुनियेंत आज अनेक वर्षं मुरत असलेले ते एक ' मुरब्बी ' आहेत असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. अशा या ' दर्दी ' ' शायरा'ला 'मैफलीं'त माझा टेकू कशाला असा सवाल साहजिकच पेश होईल. त्याचा जबाब इतकाच कीं, ' मशायऱ्यांत ' –म्हणजे कविसंमेलनांत, कवींनीं रसिक श्रोतृवृंदाला एकमेकांची 'जानपहिचान' करून देणें आवश्यक असते. तो एक सामाजिक संकेत आहे. स्नेह व सहकार यांचा त्याला आधार आहे. तेव्हां त्याच शिष्टाचाराचा मी अवलंब करीत आहें. महाराष्ट्रीय रसिक या धृष्टतेबद्दल मला माफ करतील असा भरंवसा आहे.

श्री. खांडेकर यांची प्रतिभा मूलतः वैणिक आहे. सतारीच्या तारांना अंगुलीचा स्पर्श होतांच त्याच्यांतून ज्याप्रमाणें संकृति उद्‌भूत होते, त्याचप्रमाणें एखाद्या विषयाचा स्पर्श झाला म्हणजे कवीच्या हृदयांतून कविता उत्स्फूर्त होते. फुलाला ' फुला, तूं फूल ! ' असें म्हणावें लागत नाहीं. तें आपोआपच फुलतें. तद्वतच कवीला कवितेचें आवाहन करावें लागत नाहीं. त्याच्या अंतःकरणांतून कविता अगदा सहजगत्या बाहेर पडतें. अर्थात् तिचें स्वरूप गेय असतें. कारण भाव शब्दांत साकार होतो खरा, परंतु त्याचें संपूर्ण स्वरूप शब्दांत प्रकट होत नाहीं. शब्दांना सुरांची आवश्यकता असते. कारण शब्दांचा ठराविक अर्थ सुरांच्या साहाय्यानें बदलत असतो. तेव्हां कवितेसारखी ललितकलाकृति जिच्यांत भावाविष्कार असतो, ती सदैव गेयच असते. आणि म्हणूनच कविता पद्यांत असावी, तिच्यांत भावनेला प्राधान्य असावें आणि ती सहजासहजीं हृदयंगम व्हावी असा शिष्टसंप्रदाय आहे.

गद्यांत आणि पद्यांत जो मूलभूत फरक आहे तो हाच कीं, पद्याच्या अंतर्गत रचनेंत एक नियमन असतें. मग तें वर्णांच्या लघुगुरुक्रमाचें असो, मात्रांच्या संख्येचें असो कीं अक्षरांच्या संख्येचें असो. गद्याच्या अंतर्गत रचनेंत अशा प्रकारचें नियमन नसतें. आणि म्हणूनच पद्याच्या ‘ चालीं’त जी एक ‘ सुसंगति ’ असते, ती गद्यांत दिसत नाहीं. म्हणूनच पद्याला ‘ चाल ’ असते आणि गद्याला नसते. कवितेंत ‘ चाली ’ बरोबर वर्णांनाहि महत्त्व असल्यामुळें ‘ चाल ’ व ‘ वर्ण ’ यांचा एकजीव असतो. वर्ण म्हटले म्हणजे मागोमाग शब्द व अर्थ आलेच. तेव्हां कवितेंत चाल, वर्ण, शब्द व अर्थ या सर्वांचा एकजीव असतो. ‘ चाली ’ला आपण ‘ गति ’ ही पारिभाषिक संज्ञा देऊं. गद्यांत अशी ‘ नियमित गति ’ नसते.

पद्यांत ‘ गती ’ बरोबरच वर्ण, शब्द व अर्थ यांना महत्त्व असल्याचें आपण पाहिलेंच ! गायनांत ‘ गती ’ ला महत्त्व आहे. परंतु वर्ण, शब्द व अर्थ यांचा बडिवार नाहीं. गायनांत वर्ण कमी पडत असल्यास त्यांची जागा आलापांनीं भरून काढतां येते. त्याचप्रमाणें गायनांत, ज्यांत शब्द व अर्थ नाहीं असे तराणेहि रसिक-मान्य असतात. कवितेचें पद्य आणि गायनाचें पद्य किंवा छंदशास्त्र आणि संगीत यांच्यांतील सीमारेषा या विवेचनानें स्पष्ट होईल.

श्री. खांडेकर यांच्या ‘ अरुणा ’ मधील बहुतेक कविता पद्यबद्ध असल्यामुळें गेय आहेत. ‘ उर्मिला ’ आणि ‘ उषास्वप्न ’ यांना त्यांनीं नभोवाणीच्या परंपरेस अनुसरून ‘ संगीतिका ’ म्हटलें असलें, तरी त्या ‘ कविता ’च आहेत. संगीतांत ‘ गायन ’ असतें आणि काव्यांत ‘ वाचन ’ असतें. मात्र हें ‘ वाचन ’ गद्याप्रमाणें रखडें नसतें. हें ‘ वाचन ’ कविता ज्या ‘ पद्यांत ’ असेल, त्याच्या ‘ गती’प्रमाणें असतें. या वाचनांत भावनानुकूल आंदोलनें असतात, किंचित् विराम असतात, यति असतात, वाणीचे आरोह व अवरोह असतात, स्वरांचे आघात असतात आणि द्रुत व विलंबित उच्चार असतात. पद्याच्या अंतर्गत रचनेंत नियमन असल्यामुळें या ‘वाचनांत ’ एक प्रकारची ‘सु-संगति’ प्रत्ययास येतें आणि त्यामुळें या ‘ सु-संगती ’ चा कांहीं कारण नसतांना ‘ संगीता ’ शीं संबंध जोडण्याचा प्रयत्न होतो.

श्री. खांडेकर यांना पद्याची आवड कशी आहे, तें वर ज्या दोन संगीतिका निर्दिष्ट केल्या आहेत; त्यांवरून आणि ‘ हींच राघवा, हींच पैंजणें ’* यासारख्या

---

*‘ चंद्रप्रकाश ’ पृष्ठ २२ पहा.

त्यांच्या ज्या कविता ध्वनिमुद्रित झाल्या आहेत त्यांवरून सहज लक्षांत येईल. आणि मग मी त्यांची प्रतिभा मूलतः वैणिक आहे असें कां म्हणतो तें अधिक विस्तारानें सांगण्याचें प्रयोजन उरणार नाहीं.

मुद्रणकलेचा शोध लागल्यापासून इतर अनेक लाभ झाले असले, तरी एक अतिशय मोठी हानि झाली आहे. ती ही कीं, पूर्वी कवितेचा अर्थ ' कर्णा'च्या द्वारें हृदयंगम होत असे. आणि त्यामुळें प्रत्येक शब्दाचा केवळ कोशांत सांगितलेला अर्थच आकलन होत नसे, तर कवीच्या मुखानें तो शब्द बाहेर पडतांच त्याचा व्यंजक किंवा लाक्षणिक अर्थहि त्या काळच्या ' बहुश्रुत ' रसिकास कळत असे. आजचा ' वाचक ' हा ' डोळ्यांनीं ' शब्द वाचतो आणि कोशांत त्याचा अर्थ पाहतो. आणि तो लागला नाहीं म्हणजे मग कवीवर हवे तसे ताशेरे झाडतो. कविता पद्यांत कां हवी आणि पद्याचें वाचन त्याच्या गतीप्रमाणें कां व्हावें हें येथ-पर्यंतच्या विवेचनावरून सहज लक्षांत येईल. या दृष्टीनें श्री. खांडेकर यांची कविता खरोखरच अभिनंदनीय आहे. वर उल्लेखिलेल्या दोन संगीतिकांशिवाय प्रस्तुत संग्रहांत ' उघडिलें तुलाच दार ', ' कशी येउं मी ? ', ' माझ्या कविते ! ' इत्यादि ज्या कविता आहेत त्या माझ्या या विधानाचा पाठपुरावा करतील.

श्री. खांडेकर यांनीं लिहिलेल्या या तऱ्हेच्या कवितांना आपण ' पदें ' म्हणूं म्हणजे संगीतांतील ' गीतें ' आणि काव्यांतील ' पदें ' यांच्यांतील भेद ताबडतोब ध्यानांत येईल. पदांचा प्रणेता हा हमखास सहृदय भाविक असतो. त्याचें जीवन प्राधान्येंकरून भावमय असतें. विचारांचें वजन त्याला स्वभावतःच फारसें पेलत नाहीं. भावना ही ज्या हृदयांतून उत्पन्न होते त्या हृदयासारखीच हळुवार असते. त्यामुळें पद्याचें नाजूक वाहन तिला मानवते. विचाराचा संबंध मस्तिष्काशीं आहे. तें जसें वजनदार असतें तसेच विचार असतात. त्यामुळें गद्याचें भरदार वाहन त्याला परवडतें. पद्याच्या कोमल ' चाली'ला विचाराचा अवजडपणा सहन होत नाहीं. माझ्या या म्हणण्याचें प्रत्यंतर पाहिजे असेल, तर या संग्रहांतील ' गीता ' ' सत्य, ' ' शाप, ' ' आहेस ईश्वरा, काय ? ' इत्यादि कविता वाचून पहाव्या. या कवितांतून—

जी श्रद्धेमधुनी जन्मा यावी भक्ती
ती भक्ती नसते–ती तर रे, आसक्ती

अन् प्रीतीवरतीं होतें केव्हां सक्ती
तर सत्यापेक्षां श्रेष्ठ इथें हो युक्ती !

असा एखादा सुंदर व उपयुक्त तात्त्विक विचार आढळतो. परंतु तो पद्यापेक्षां गद्यांत शोभला असता व तेथें त्याचा अधिक मनोहर विस्तार करतां आला असता असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. अशा या गद्यसदृश रचनेला अलीकडे "वैचारिक कविता" हें नांव देण्याची वहिवाट पडली आहे. परंतु ही वैचारिक कविता रसमय नसल्यामुळें अंतःकरणास स्पर्श करीत नाहीं आणि सविस्तर व विवेचक नसल्यामुळें मनास चालना देत नाहीं. हें सत्य निष्ठुर असलें, तरी दृष्टिआड करतां येत नाहीं. त्याला निरुपाय आहे !

वस्तुतः श्री. खांडेकर यांची प्रतिभा अशा प्रकारच्या 'वैचारिक कवितां'ना अनुकूल नसतांनाहि त्यांनीं अशा कांहीं तुरळक कविता लिहिल्या आहेत हें केवळ कालमाहात्म्य होय ! श्री. खांडेकर यांच्या प्रतिभेचें खरें वैभव जर कोठें दृष्टिगोचर होत असेल, तर तें त्यांच्या भावकवितांतूनच ! त्यांच्या भावकवितांत नाद, अर्थ आणि सूचकता म्हणजेच पारिभाषिक संज्ञेंतील ध्वनि यांचा मोठा मधुर व मनोहर मिलाफ झाला आहे. श्री. खांडेकर यांचें कविहृदय अतिशय भावकोमल आहे. त्यांच्यापाशीं भावनेला मूर्त करणारी कल्पनाशक्ति आहे, परंतु ती तरल विरल आहे. तिच्यांत गरुडाची भरारी नाहीं किंवा दृष्टीला दिपवून टाकण्याचें विजेचें सामर्थ्यहि नाहीं. मात्र तिच्यांत तारकेची चमक आहे. आणि ती दाहक नसली, तरी मोहक आहे. त्यांच्या वृत्तीचा भ्रमर या फुलावरून त्या फुलावर गेला, तरी पुन्हा त्या फुलावरून या फुलावर परत भ्रमण करणारा आहे. आणि त्याच्या गुंजनांत माधुरी असली, तरी ती ठराविक आहे. गुङ्‌गुङ् गुङ् गुङ् ही एकच त्याची गुणगुण आहे. माझ्या या विधानाची साक्ष हा त्याचा कवितासंग्रह वरवर चाळला, तरी सहज पटेल.

श्री. खांडेकर हे जात्याच सश्रद्ध आहेत. त्यामुळें त्यांच्या बऱ्याच कविता ईश्वरास अनुलक्षून आहेत. त्याच्या:अस्तित्वावर त्यांचा विश्वास आहे. म्हणूनच जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि आशेची आहे. त्यांच्या जीवनांत लहानमोठे दुर्धर प्रसंग आले असतील; परंतु त्यांना तोंड देण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहांत क्वचित् कांहीं ठिकाणीं विमनस्कतेचे उद्‌गार कानीं पडतात; परंतु प्रस्तुत कवितासंग्रहांत त्यांची दृष्टि निर्मळ आणि प्रकृति निकोप असल्याचें दृष्टीस पडतें. याला

कारण त्यांच्या ठिकाणची दृढभक्तीच होय यांत शंका नाहीं. परमेश्वराच्या प्रेरणेनेंच आपण सुखरूप कालक्षेप करीत आहोंत हें सांगतांना त्यांची वाणी म्हणते :—

जेव्हां तेव्हां पाहतों मी
तुझ्या हातीं माझे कर !
पंख मनाचे माझिया धांवतात जिथें–जिथें
हातीं धरूनिया मला तूंच नेसी तिथें तिथें
आणि माझ्या भावनांचा तूंच करिसी उद्धार
तुझ्या हातीं माझे कर !
चाचपडे, धडपडे जर का मी अंधारांत
नकळत देई मला कुणीतरी तिथें हात
आणि येतां प्रकाशांत कळे तुझा उपकार
तुझ्या हातीं माझे कर !

ईश्वरविषयक भक्तीचेंच दुसरें रूप म्हणजे घरांतील वडीलधाऱ्या मंडळीसंबंधींची निष्ठा होय. भक्तींत आदराबरोबरच भयाची भावना असते. परंतु निष्ठेंत आदराच्या जोडीला प्रेम असतें. आणि तेंहि वडिलांपेक्षां आईबद्दल विशेष प्रमाणांत असतें. श्री. खांडेकरांनीं एक कविता आपल्या आईला उद्देशून रचली आहे. तिच्यांत ही निष्ठा अतिशय तन्मयतेनें आविष्कृत झाली आहे. श्री. खांडेकर म्हणतात :—

मी लिहितों तें वाचायाला हवेत गे, तव वत्सल डोळे
माझें कौतुक करावयाला शब्द हवे तव ओठामधले
धन्य वाटुनी फिरवावा तूं माझ्या पाठीवरूनी हात
त्या तव हातांतिल संजीवन करील माझें जीवित सार्थ
तुझ्याच प्रेमळ वात्सल्याची मनास माझ्या या आसक्ती
तुझ्याच आशीर्वादामध्यें माझी सगळी आहे स्फूर्ती

ईश्वरविषयक दृढभक्ति आणि मातृविषयक गाढ अनुरक्तीप्रमाणेंच श्री. खांडेकर यांची प्रणयासक्ति उत्कट आहे. परंतु तिच्यांत अद्यापि अवखळ खळखळ फार आहे. अर्थात् तीहि सुखप्रद आहे. परंतु जों जों त्या प्रणयाचें अंतरंग खोल खोल होत जाईल, तों तों त्याचें जीवन निवळ होऊन त्याला एक प्रकारची गूढ गहन गंभीरता प्राप्त होईल असें वाटतें. नमुना म्हणून या ओळी वाचा:—

कविता मी लिहितांना पाठीमागें रेंगाळत
हवीस तूं बिलगून कैंस माझे खेळवीत
तुझ्या लोचनीं पाहतां न्याहळून माझें रूप
हवेंस तूं बिलगाया मला द्यावया हुरूप
कुरवाळतां मी कधीं तुझे बिल्वरांचे हात
बिलगून गुंफावास कर-हार या गळ्यांत !

या ओळींतील नजाकतदार उच्छृंखळपणांत एक प्रकारचा अवीट गोडवा आहे यांत संशय नाहीं. परंतु हें उसळणें–घुसळणें मनावर कायमची मोहिनी टाकीत नाहीं. अगदीं याउलट पुढील ओळी मनावर जादूचा असर करतात. त्यांचें ' पाणी ' कसें शांत व संथ आहे !

जिथें तिथें या घरांत तुझे हात फिरतात
याच अभिमानामध्यें फुलतों मी हृदयांत
तुझ्या कंकणांचें गीत गाती शब्द सुगंधित
आणि त्याचा परिमल घुमे कानाकोपऱ्यांत
कानाकोपरा घराचा तुझ्या हस्तस्पर्शासाठीं
तळमळे माझ्यासम तुझ्यासाठीं–तुझ्यासाठीं !
पसारा मी घालतां हा आवरिसी तूं हासत
तेच हात पकडून स्वप्न पाहतों निवांत !

तेव्हां सुरुवातीचे प्रणयाचें हें विलोल नर्तन पुढें शांत समाधींत परिणत होईल असें भविष्य केल्यास तें चुकेल का ?

श्री. खांडेकर यांच्या बहुतेक कविता याच तीन विषयांना वाहिलेल्या आहेत, आणि त्या ठराविक पादाकुलकांतून किंवा तत्सदृश अष्टमात्रिक रचनांतून प्रस्फुटित झाल्या आहेत. त्याच त्या चालीवर तेच ते भाव, परंतु प्रत्येक वेळीं नव्यानें आळवावयाचें हा भावकवीबाबतचा एक नेहमींचा अनुभव आहे. जुनें अभंगवाङ्मय या विधानाचें समर्थन करील. तोच प्रकार ' अरुणा ' मध्यें प्रत्ययास येतो. श्री. खांडेकरांच्या वृत्तीला व कवितेला मीं वर जें ' भ्रमराचें भ्रमण ' म्हणून म्हटलें आहे तें याच अर्थानें !

श्री. खांडेकर यांच्या कवितेचा आणखी एक भाग आहे. तो म्हणजे निसर्गविषयक कवितांचा ! या प्रकारच्या कवितांत खांडेकरांच्या अंतरंगानें निसर्गांत प्रवेश केला

नसून, निसर्गानेंच खांडेकरांच्या अंतरंगांत प्रवेश केला आहे. आधुनिक काव्यांतील निसर्गविषयक कवितांचा हा एक रमणीय विशेष आहे. निसर्गच कवीच्या अंतः-करणांत संस्थित असला कीं, तो कवीच्या अंतरंगांतील इतर भावनांचे रंग स्वतःच्या रंगांत मिसळून मग कवितेच्या रूपानें बाहेर पडतो. आणि त्यामुळेंच रसलोलुप वाचकाला पुढील ओळींसारख्या कांहीं ओळी एकसारख्या मनाशीं गुणगुणत राहाव्या असें वाटत असतें:-

उषेपरी ये माझ्या दारीं कांचनकर उभवून
आणि माझिया अंधारीं या हसुं दे पहिलें ऊन

अलीकडील कवितेंत जो नवा बदल वाटतो, तो वास्तविक काव्यवस्तूचा नसून, शैलीचा व अभिव्यक्तीचा बदल आहे. वरील दोन ओळी या म्हणण्याची ग्वाही देतील. श्री. खांडेकर यांच्या कवितेंत इथून तिथून अभिव्यक्तीच्या चारुतेचे असे कितीतरी आकर्षक नमुने नजरेस पडतील. अभिव्यक्तीप्रमाणेंच शैलीहि काव्यांतर्गत असते. काव्यवस्तूबरोबरच शैलीहि जन्माला येते. शैली म्हणजे कांहीं अंगांत घालण्याचा कोट नाहीं. कोट हा जसा अंगाच्या लांबीरुंदीप्रमाणें कापतात तसें शैलीचें नाहीं. जीवाला ज्याप्रमाणें त्वचा त्याप्रमाणेंच काव्यविषयाला शैली आहे. ती त्यापासून वेगळी काढतां येणेंच शक्य नाहीं. खांडेकरांनीं नवीन कवितेची निराळी शैली व सुंदर अभिव्यक्ति बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आपलीशी केली आहे यांत संशय नाहीं.

श्री. खांडेकर यांची कविता पूर्णतया निर्दोष आहे असें नाहीं. आणि तसें ते स्वतःसुद्धां म्हणणार नाहींत. माझी भूमिका खांडेकरांच्या स्नेह्याची असल्यामुळें 'गुह्यंच गुह्यति गुणान् प्रकटी करोति' येवढेंच माझें कर्तव्य आहे. परंतु येथें जातां जातां कांहीं उणीवांची जाणीव करून देणें आवश्यक आहे. खांडेकरांची 'उर्मिला' म्हणजे बाबू मैथिलीशरण गुप्त यांच्या साकेतांतील उपेक्षिता उर्मिलेचीच आवृत्ति आहे. पण हिंदी उर्मिलेचा हार्दिक विकास मराठी उर्मिलेंत दिसत नाहीं. कारण लक्ष्मण व सीता मराठी उर्मिलेची थोरवी गातातः-

थोर तुझा हा त्याग उर्मिले
तूंच खरें रामायण रचिलें

परंतु हें थोरवीचें स्तोत्र रामायणांतील रामाच्या तोंडीं जर घातलें असतें, तर कलादृष्ट्या तें अधिक उचित झालें असतें. अनुकृति हा मनुष्यस्वभाव आहे. आणि

कांहीं मर्यादेपर्यंत ती उत्तेजनार्हहि आहे. परंतु प्रतिकृतीच्या बाबतींत मात्र तसें म्हणतां येत नाहीं. दुसऱ्यांच्या कागदांप्रमाणें स्वतः कागद तयार करावा. परंतु सूर्याच्या किरणांत तो आडवा धरल्यास त्यांतील छाप मात्र आपला स्वतःचा असावा असेंच कुणीहि म्हणेल. मोठ्या आनंदाची गोष्ट आहे कीं हा कवितासंग्रह तशा प्रतिकृतींपासून अलिप्त आहे.

श्री. खांडेकरांच्या कवितेची मैफल मोठी शान शौकतदार आहे. तिचें वर्णन त्यांनीं असें केलें आहे :—

अष्टदिशाच्या या भिंतींना हवा उषेचा फिक्कट रंग
विहगांनीं अन् सुरांत गावा उत्साहाचा एक अभंग
वायूच्या झुळुकेनें जावें झाडुन दारापुढलें अंगण
प्राजक्ताच्या मंद फुलांनीं घालावी त्यावरतीं पखरण
सूर्य-मयूरानें मग यावें उभवित अपुला तेज-पिसारा
मनोरथांतिल आकांक्षांनीं पुढें पिटावा त्यांत नगारा
रंगुन जावी येथें मैफल या दूर्वांच्या गालिच्यावर
अन् डोळ्यांनीं जरा बघावें जगांतलें या वैभव सुंदर !

या मैफलींत त्यांनीं दोस्त म्हणून मला जागा दिली याबद्दल मी त्यांचा ‘ शुक्रगुजार ’ आहे. मैफल ऐकण्यास उत्सुक असलेल्या मराठी रसिकांना त्यांनीं हा कवितांचा नजराणा भेट दिला आहे. त्यावर मी माझ्या प्रस्तावनेची ही साधीसुधी सुती ‘ दस्ती ’ पांघरूण म्हणून घातली आहे. ती दूर सारून रसिकांनीं माझ्या मित्रांच्या या नजराण्याचा स्वीकार करावा अशी मी त्यांना मोठ्या अदबीनें विनंति करीत आहें.

श्रीधर सदन—श्रद्धानंदनगर,
दक्षिण अंबाझरीमार्ग,
नागपूर—अजनी.
बुधवार, १५ मे १९५७.

— भवानीशंकर पंडित.

# कवितानुक्रम


| कविता | पृष्ठ | कविता | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. अरुणा ... ... | १ | १८. फूल ... ... | १९ |
| २. चांदण्याच्या पावसांत... | २ | १९. गीता ... ... | २० |
| ३. तुझ्या प्रकाशीं ... | ३ | २०. रात्र ... ... | २१ |
| ४. ही कार्तिकांतली पहाट | ४ | २१. सत्य ... ... | २२ |
| ५. तुझें तेज ... ... | ५ | २२. शाप ... ... | २३ |
| ६. केतकीच्या पानासम ... | ६ | २३. मी तुझीच सतार ... | २४ |
| ७. सांग, भविष्या ! ... | ७ | २४. वैजयंती ... ... | २५ |
| ८. दे तुझ्या पुजेचा मान... | ८ | २५. आज वर्ष बदललें ... | २६ |
| ९. बापूजी ! ... ... | ९ | २६. आहेस ईश्वरा, काय ? | २७ |
| १०. अजुनी आहे उभी संस्कृति ! | १० | २७. चंद्रावरतीं झांकण घाला | २९ |
| ११. एका मध्यरात्रीं ... | १२ | २८. मनीषा ... ... | ३० |
| १२. मी भावगीत देवा ! ... | १३ | २९. वर्षा ... ... | ३१ |
| १३. मी फुलमाळ ... | १४ | ३०. जाणीव ... ... | ३२ |
| १४. तुझ्या हातीं माझे कर | १५ | ३१. तुझे हात ... ... | ३३ |
| १५. कलिके ! ... ... | १६ | ३२. ओवी ओवायाची तर | ३५ |
| १६. पहाट ... ... | १७ | ३३. किनारा ... ... | ३६ |
| १७. निर्माल्यांतिल कळी ... | १८ | ३४. उमल हळुहळू ... | ३७ |

| कविता | पृष्ठ | कविता | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ३५. बिलगती ... ... | ३८ | ५२. क्षमा ती असावी ... | ५६ |
| ३६. हसलें असतें ऊन जरा तर | ३९ | ५३. शिखर ... ... | ५८ |
| ३७. ज्वालामुखी ... | ४० | ५४. गीत ... ... | ५९ |
| ३८. स्वागत ... ... | ४१ | ५५. विडा ... ... | ६१ |
| ३९. माला ... ... | ४२ | ५६. उघडिलें तुलाच दार | ६२ |
| ४०. पंख माझे पसरले ... | ४३ | ५७. कशी येउं मी! ... | ६३ |
| ४१. उगीच ... ... | ४४ | ५८. नवी वाट काढूं ... | ६४ |
| ४२. स्मित ... ... | ४५ | ५९. कोरांटीला पदर अडकला | ६६ |
| ४३. उषेपरी ये ... ... | ४६ | ६०. श्रावणधार ... ... | ६७ |
| ४४. श्रद्धा ... ... | ४७ | ६१. रावा ... ... | ६८ |
| ४५. शुक्र हासतो ... ... | ४८ | ६२. पाझर ... ... | ७० |
| ४६. कशी भुलली पहाट ?... | ४९ | ६३. जाग ... ... | ७१ |
| ४७. दडपण ... ... | ५० | ६४. माझ्या कविते ! ... | ७२ |
| ४८. वीज कुठें ती ? ... | ५२ | | |
| ४९. प्रतीक्षा ... ... | ५३ | **दोन संगीतिका** | |
| ५०. पहा एकदां तरी ... | ५४ | १. उर्मिला ... ... | ७६ |
| ५१. मैफल ... ... | ५५ | २. उषास्वप्न ... ... | ८० |


● ● ●

# अरुणा

संग्रह शाखा (स्थळ प्रत) ग्रं. क्र. ६३२८

सोडून अपुले केश सोनेरी
हासत लाजत प्राची ये दारीं !
अधरीं दाविते माणिक-स्मित
रंगून निघाले क्षितिज-कांठ
मख्माली पदर, हिरवी साडी
वाजविते हळू दाराची कडी !
गळयांत घातले फुलांचे हार
लतांच्या केसांत सुमसंभार
कोवळया उन्हाचा दिसे प्रकाश
प्रसन्न धरणी, हासे आकाश
पिसारून अशी प्रभा गोजिरी
मंगल शुभदा प्राची ये दारीं !

घालीत शुक्राला विंझण वारा
खुणवी तयाला जाया माघारा,
वधू ही अरुणा दंवांत न्हाली
म्हणतें : चंद्रा, जा आल्या पाऊलीं.
आणिक लावून आपुले ओठ
फुलवी दारींचा मंद प्राजक्त !
हासत मुखानें करी स्वागत
हसावें जगानें हें मनोगत
भरून आपुली ओटी केशरी
सुवासिनी आली अरुणा दारीं !

अनुक्रम 22023 दि. 3/44
क्रमांक 9324 नों. दि. 4/44

## चांदण्याच्या पावसांत

चांदण्याच्या पावसांत
अंग-अंग भिजवित
चालली ही वसुंधरा
एकटीच आनंदांत.
झोपीं गेलं उभं जग
नाहीं कोणी सोबतीला
अभिसारिका निघाली
प्रियकराच्या भेटीला.
जातां जातां मधूनच
पवनाच्या पदरानं
भिजलेलं ओलं अंग
घेई हळूच टिपून.
पण राहिल्या तशाच
ओल्या बटा भाळावर
दंवबिंदूंचे मौक्तिक
ओघळती वक्षावर
तोंच तिला अचानक
शुक्र भेटला वाटेंत
आणि म्हणाला, " आलों मी-
दीप घेऊन करांत.
तुझ्यासवें तेवढींच
चार पावलें चालेन
नारायणाची चाहूल
लागतांच परतेन."
शब्द ऐकतांच त्याचे
धरा मनांत लाजली
आणि दुसऱ्याच क्षणीं
नारायणरूप झाली.

●

# तुझ्या प्रकाशीं

तुझ्या प्रकाशीं मी फुलणार
हिरण्यगर्भा, तव तेजाचा मला दिव्य शृंगार

करांत तुझिया कर हे गुंफुन
युगेंयुगें मी अशीच येइन
चुकुनी सुटला जर हा तव कर होइल मज अंधार

एक तुझ्या तेजाचा मी कण
तुझ्यांत अवघें माझें मी-पण
प्रकाश प्राशित पूजित राहिन उरांतला अंगार

तुझ्याच तेजाचें मी वैभव
तुझ्या प्रभेचा मजला गौरव
तेजोदेवा, प्रदक्षिणा तव घडे मला अनुधार

तुझीं पावलें चुरावयाला
तुझ्या पदीं मज वास मिळाला
पावन केलें तूंच मला हा देउनि गोलाकार

अपुल्या प्रीतीचीच प्रभा ही
विश्वाला दे पवित्र ग्वाही
नारायणरूपांत कुणाही जीवन तेजाकार
तुझ्या प्रकाशीं मी फुलणार !

●

# ही कार्तिकांतली पहाट

ही कार्तिकांतली मधुर पहाट
पदर सावरित निघे पुजेला ओलेती सुस्नात.

गार हिमाच्या गंगेमधुनी
ही तर आली डुंबडुंबुनी
गंगेसम हो मनही निर्मळ गंगेच्या उदकांत.

ओली साडी अंगावरतीं
पिळतां पिळतां वाऱ्यावरतीं—
गार गारवा त्यांतुन गळला नकळत या विश्वांत.

सूर्यप्रभेला पुजावयाला
निघे अशी ओलेती बाला
अन् थंडीचें सूक्त गातसे 'कुड् कुड्' ही ओठांत.

कडक गारवा अवतींभंवतीं
नेत्र हिचे पण सूर्यावरतीं
उधळित चाले वाटेवरुनी फुलें धुक्याची दाट!

पसरे भूवर जरी हिंवाळा
हिच्या उरामधिं ऊन उबारा
पवित्रतेची ऊब गुलाबी थंडींतहि हृदयांत!

ही कार्तिकांतली मधुर पहाट!

●

# तुझें तेज

तुझें तेज नारायणा,
प्राण ओती जगावर
जगायचें आहे मला
त्याच तुझ्या तेजावर.

माझ्या जीवनाचा दीप
ओवाळितें मी भास्करा!
तुझें नांव रविराज
माझें नांव वसुंधरा.

तुझ्या तेजाचा मी कण
हेंच मला रे, भूषण
तुझ्या वाटेवर नित
उभे माझे पंचप्राण.

तुझ्या तेजापुढें तुला
दिसेल का माझा दिवा?
पण नको अव्हेरूंस
माझ्या प्रीतीचा काजवा.

तुझें तेज नारायणा,
आग ओकी जगावर
जळायचें पण मला
त्याच तुझ्या तेजावर!

●

## केतकीच्या पानासम

केतकीच्या पानासम
तुझा सोनियाचा रंग
पाठीवर रुळतात
कृष्ण केसांचे भुजंग.

आणि भ्रमरासारखे
तुझे डोळे काळेशार
जणुं रुंजी घालतात
भुंगे सोनचाफ्यांवर.

कौमार्याचा अभिमान
तुझ्या बेफाट वृत्तींत
यौवनाचा विभ्रम हा
चाले तुझ्या लहरींत.

तुझ्या आरोग्याची प्रभा
लालबुंद ओठावर
मंत्रमुग्ध होती किती
तुझ्या हालचालीवर.

जवानीच्या पानाआड
फुले सौंदर्याची कळी
उद्यां फुलायाची याच
सोनचाफ्यांची पाकळी!

●

## सांग, भविष्या !

सांग भविष्या, भाग्य उद्याचें !
वसुंधरेच्या पाठीवरती
कशी कुणाची राहिल वसती
असेल वा ना कुठें संस्कृती
स्थान कोणतें कुठें कुणाचें ?
यंत्रामधल्या मंत्रामधुनी
ऐकूं येतिल कसलीं गाणीं ?
स्वरांत स्वर येतिल का जुळुनी
एकदिलाचे स्त्री-पुरुषांचे ?
जननीच्या नयनांतिल पाणी
पुण्योदक जणुं शिंपुन भुवनीं
उद्यां धन्य का होइल धरणी—
कार्य पाहतां सत्पुत्रांचें ?
आजकालचे सुवास, चंदन
उद्यां आपुलें शरीर झिजवुन
निःश्वासांना देतिल जीवन
स्वप्न हेंच का असेल त्यांचें ?
भूषवावया नव सिंहासन
राम यायचा किंवा रावण ?
प्रजा कुणाचें करील पूजन
अनीतिचें कीं सद्धर्माचें ?
श्रद्धेपोटीं, ध्येयापाठीं
काय कुणाच्या असेल ओठीं ?
कोण यायचें कोणा पोटीं—
उभवायाला विश्व आमुचें ?
सांग भविष्या, भाग्य उद्याचें !

## दे तुझ्या पुजेचा मान

दे मजला प्रभु, तुझ्या पुजेचा मान.
अभिषेकाच्या पात्रामधुनी
तीर्थांची गंगा होउन मी
यावें म्हणतों तुझिया धार्मी
घालाया तुज स्नान.

चंदनरूपें तव देहाचा
मिळेल का मज स्पर्श सुखाचा
सुवास उधळित सौगंधाचा
व्यापिन देवस्थान.

पदयुगुलें तव पुजावयाला
कृष्ण-तुळस कर देवा, मजला
तिथेंच बसुनी तव चरणाला
बघेन तव मी ध्यान.

देहाचा या कापुर होउन
वाटे जावें क्षणभर उजळुन
तुझ्या पदीं हें जीवन वाहुन
व्हावें धन्य निदान !

निरांजनांतिल होउनि ज्योती
ओवाळिन मी तुला आरती
सूर होउनी वीणेवरतीं
गाइन तव जयगान
प्रभो, दे तुझ्या पुजेचा मान.

●

# बापूजी !

बापुजी, आम्ही तुम्हाला हिंदवासी वंदितों
आमुच्या श्रद्धांजलीचीं शब्दसुमनें वाहतों

भारताच्या मुक्ततेची एक होती ज्यां स्पृहा
थोर त्या वीराग्रणींचे जे तुम्ही नेते महा
गौरवाची त्या तुम्हां गीतांजली ही अर्पितों

शस्त्र शांतीचें करीं घेऊन जे जे झुंजले
अन् अहिंसा, सत्य यांचे पाठ ज्यांनीं घोकले
त्या हुतात्म्यांचे महात्मा पूज्यभावें पूजतों

जागवीलें राष्ट्र सारें राष्ट्रझेंड्याखालतीं
गीत गातांना प्रभूचें मात्र गेला शेवटीं
आज डौलानें तिरंगी तोच झेंडा डोलतो

●

# अजुनी आहे उभी संस्कृति !

हिमालयाच्या गंगेमधुनी
तेंच वाहतें झुळझुळ पाणी
पावित्र्याची शुभ्र निशाणी
भारतभूच्या पाठीवरती
अजुनी आहे उभी संस्कृती.

पांचहि पांडव ज्या जागेवर
राज्य भोगुनी झाले नरवर
इंद्रप्रस्थिच्या त्या भूमीवर
दिल्ली असुची राज्यावरतीं
अजुनी आहे उभी संस्कृती

सह्याद्रीच्या दरीदरींतुन
' हर हर ' वाणी उठते गर्जुन
मर्द मावळा या खोऱ्यांतुन
जमेल अगदीं अर्ध्या रात्रीं
अजुनी आहे उभी संस्कृती

गोदा-कृष्णेच्या या पुलिनीं
रामदासही असतिल अजुनी
' दासबोध ' हो त्यांची वाणी
उद्यां कदाचित् सगळ्यां हातीं
अजुनी आहे उभी संस्कृती

घेउनिया काशीची गंगा
कितीक यात्रेकरूच्या रांगा
पुजतां रामेश्वरच्या लिंगा
उघड दाविती धैर्य–चिकाटी
अजुनी आहे उभी संस्कृती

पहा आमुचें कुटुम्ब–लेणें
पतिव्रतांचें तेंच वागणें
'शीलासाठीं जगणें–मरणें'
हीच तयांची विशुद्ध नीती
अजुनी आहे उभी संस्कृती

जगतों जोंवर श्रद्धेपोटीं
सदैव अमुच्या राष्ट्रासाठीं
जगावयाचीं नातीं नीती;
—आम्ही मानव अमुच्यासाठीं
अजुनी आहे उभी संस्कृती

●

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 22073 दि.
क्रमांक 7365

## एका मध्यरात्रीं—

हो मध्यरात्र अन् चंद्रहि कलला खालीं
परि टिपुर चांदणें तुझिया शयन-महालीं
या खिडकीमधुनी झोत रुप्याचा आला
सखि, मंचक हा तव चंद्रकरांमधिं न्हाला
सौभाग्यवती तूं नवी विवाहित बाला
हा हातीं हिरवा चुडा तुझ्या भरलेला
पण भेट न अजुनी तुमची एकान्तांत
जरि मनांत कितिही आतुर तूं रतिक्लांत!
हें सोडुन अपुलें मायेचें माहेर
तुज जायचें ग, उद्यां सासरीं दूर
ही फक्त आजची होती मध्यें रात्र
पण जागविली तूं गुम्फित भावी चित्र
अन् रचतां रचतां मधु-स्वप्नांची माला
आत्तांच लागला तुझा कुठें हा डोळा
झोपेंतहि हसशी, उतरे लाली गालीं
हळु हलती मधुनी अधर तुझे मखमाली.
त्यालीस पांढरी वायल तूं नउ-वारी
थंडींत पुरें का वस्त्र असें एकेरी?
बघ पदरहि गळला जरा तुझा बाजूला
ही शाल राहिली तिष्ठत तव चरणाला.
दुमडून आपुला डावा हात उशाला
तूं शांत झोंपसी आतां एक कुशीला
किति चुरगळली ग, चादर अंगाखालीं
अन् उशी उशाची पडली कुस्करलेली!
शृंगार न उसना देहावर लव मात्र
हें गौर गळ्यामाधें साधें मंगळसूत्र
नी मुगाएवढीं टिकली भव्य कपाळीं
—पण बघतां बघतां चंद्र उतरला खालीं!!

●

# मी भावगीत देवा !

मी भावगीत देवा
भाव अर्पुनी तव चरणाशीं
करायची सेवा

उगाळुनी भक्तीचें चंदन
सुमनामधला सुवास होउन
मना वाटतें सदैव माझा
देव मी पुजावा.

सुरासुरांची गुम्फण करुनी
शब्द जुळविले त्यासाठीं मी
आस हीच कीं, या ओठांतुन
प्रभु माझा गावा.

शब्द-सुरांचें माझें भूषण
भक्तिरसाची वाणी होउन
भाव मनींचा तुज कळवाया
मला मान द्यावा

●

## मी फुलमाळ

होउन आलें मी फुलमाळ
प्रभु, कंठीं–वक्षीं तव रुळणार

तुझिया हृदयावरीं विसावुन
तुझ्यांत माझें विसरिन 'मी' पण
सुवास–पूजन तुझें कराया
सदा मला मिळणार

कळी–पाकळीच्या ओठांनीं
टिपून घेइन अमृत–कण मी
गळ्यांत तव रुळतांना
माझा सुगंध दरवळणार

फुले कळीची आज पाकळी
घे देवा, मज हृदयाजवळीं
निर्माल्यांतहि सुवास माझा
तुझ्या उरीं उरणार

होउन आलें मी फुलमाळ !

●

## तुझ्या हातीं माझे कर

जेव्हां तेव्हां पाहतों मी
तुझ्या हातीं माझे कर !

करीं धरितां लेखणी लिहायला ओळी दोन
तूंच अलगद तिचा वळविसी दृष्टिकोन
आणि तुझ्या मनांतलें उठे खालतीं अक्षर
तुझ्या हातीं माझे कर !

पंख मनाचे माझिया धांवतात जिथें-जिथें
हातीं धरूनिया मला तूंच नेसी तिथें-तिथें
आणि माझ्या भावनांचा तूंच करिसी उच्चार
तुझ्या हातीं माझे कर !

चाचपडे, धडपडे जर का मी अंधारांत
नकळत देई मला कुणीतरी तिथें हात.
आणि येतां प्रकाशांत कळे तुझा उपकार
तुझ्या हातीं माझे कर !

जागेपणीं हिंडतांना, स्वप्नांत वा रंगतांना
तुझ्यावांचून जीवना रंग मुळींच चढेना
'माझें' गीत म्हणतों मी पण तुझे शब्द-सूर
तुझ्या हातीं माझे कर !

●

## कलिके !

कलिके, उमलुं नको इतक्यांत
धुक्यामधुन या उजळायाची अजुनी रम्य पहाट.

तुवां उघडितां अर्ध्या-मिटल्या
मृदुलमृदुल या मुग्ध पाकळ्या
धुंद गंध तव भरून जाइल अवनीच्या परिघांत.

तुझें सुगंधी धुंद प्रलोभन
टाकिल मधुपांना वेडावुन
लुटावयाला सुवास-रस तो गातिल भ्रमर सुरांत.

रविबिंबाची येतां चाहुल
टाकिल कोणी पुढती पाउल
शैशवांतलें यौवन अपुलें उधळुं नको नादांत.

पुजावयाचा तुझा प्रभू तुज
करावयाचें त्याशीं हितगुज
त्या देवाच्या स्पर्शांवांचुन फुलूं नको पुष्पांत.

सौरभराणी ! तुला न जाणिव
यौवनाहुनी बरवें शैशव
फुलशिल क्षणभर—समीप पण सखि, निर्माल्याची वाट !

कलिके, उमलुं नको इतक्यांत !

●

## पहाट

अवचित येतां जाग पहाटे
विकसित होतें माझें हें मन
उठवाया मज झोपेमधुनी
येती कानापार्शी कंकण

मऊ रेशमी तव केसांच्या
बटा माझिया गालावरतीं
हळूच जाती चोरुन स्पर्शुन
रोमांचांना चढवित कांती.

चाटुन जाइल श्वास ऊनसा
सुखवित माझ्या नसानसांतुन
आणिक माझे जागे डोळे
वेड्न मीही अधिकच झाकुन!

माझ्या केसांमधुनी सहजच
फिरतिल नाजुक प्रेमळ बोटें
शब्दामधला अर्थ असा या
मधुर कृतींतुन अस्फुट उमटे.

भिडेल आतां माझ्या ओठीं
मऊमऊशी अधर-पालवी
त्यांत करांची मिठी पडावी
—पहाट रंगत अशी फुटावी!

●

# कलिके !

कलिके, उमलुं नको इतक्यांत
धुक्यामधुन या उजळायाची अजुनी रम्य पहाट.

तुवां उघडितां अर्ध्या-मिटल्या
मृदुलमृदुल या मुग्ध पाकळ्या
धुंद गंध तव भरून जाइल अवनीच्या परिघांत.

तुझें सुगंधी धुंद प्रलोभन
टाकिल मधुपांना वेडावुन
लुटावयाला सुवास-रस तो गातिल भ्रमर सुरांत.

रविबिंबाची येतां चाहुल
टाकिल कोणी पुढती पाउल
शैशवांतलें यौवन अपुलें उधळुं नको नादांत.

पुजावयाचा तुझा प्रभू तुज
करावयाचें त्याशीं हितगुज
त्या देवाच्या स्पर्शावांचुन फुलूं नको पुष्पांत.

सौरभराणी ! तुला न जाणिव
यौवनाहुनी बरवें शैशव
फुलशिल क्षणभर–समीप पण सखि, निर्माल्याची वाट !

कलिके, उमलुं नको इतक्यांत !

●

## पहाट

अवचित येतां जाग पहाटे
विकसित होतें माझें हें मन
उठवाया मज झोपेमधुनी
येती कानापाशीं कंकण

मऊ रेशमी तव केसांच्या
बटा माझिया गालावरतीं
हळूच जाती चोरुन स्पर्शुन
रोमांचांना चढवित कांती.

चाटुन जाइल श्वास ऊनसा
सुखवित माझ्या नसानसांतुन
आणिक माझे जागे डोळे
घेइन मीही अधिकच झाकुन !

माझ्या केसांमधुनी सहजच
फिरतिल नाजुक प्रेमळ बोटें
शब्दामधला अर्थ असा या
मधुर कृतींतुन अस्फुट उमटे.

भिडेल आतां माझ्या ओठीं
मऊमऊशी अधर-पालवी
त्यांत करांची मिठी पडावी
—पहाट रंगत अशी फुटावी !

●

# निर्माल्यांतिल कळी

निर्माल्यांतिल कळी एक मी
पुन्हा एकदां तुला पुजूं दे
उरांत आहे धगधग अजुनी
तोंवर तुझिया पदीं पडूं दे !

पानाआडुन सुवासवसना
फुलवित होतें माझें यौवन
तुझेंच होतें करीत चिंतन
जन्मापासुन मी रात्रंदिन

कळे उरींचे धुंद टपोरे
तुझ्यामुळें अभिमानें फुगले
आतुरलेलें हें माझें मन
फुलण्याआधीं तुझेंच झालें !

विकास नव्हता, नव्हती जाणिव
हाच गुन्हा का माझा व्हावा ?
पाकळीस जें तेंच कळीला—
सदा वाटतें देव पुजावा !

निर्माल्यांतहि मला वाटतें
अजुनी नाहीं झाली पूजा
सुवास माझ्या या कोषांतीं
धगधग तोंवर प्रभु, तूं माझा !

●

# फूल

तुझ्या प्रकाशांत प्रभो,
गीत गुंफीन गंधाचें
तुझ्या तेजधारामधें
अंग भरेल रंगाचें !

तुझ्या किरणांचे स्वर
ऐकत मी डोलणार
कळींतून पाकळींत
पहाटेला फुलणार.

दंवबिंदूचा पदर
तुला पाहतों घेईन
तुझें होतांच दर्शन
तुला सर्वस्व वाहीन !

तुझ्या करस्पर्शानें तूं
कुरवाळतांच मला
रंग आणि गंधांतून
फुलतील माझ्या कला.

तुवां उजाळितां जग
मीही प्रभू, उमलेन
क्षितिजाच्या उंबऱ्यांत
पहिलें घे माझें दान !

●

# गीता

आजकालची आमुची गीता
शिकवित आहे केवळ भोग
अनाध्याय कर अध्यायाचा
हेंच सांगती अठरा योग !

भक्ती नुरली श्रद्धेवरती
श्रद्धेचें तर झालें श्राद्ध
कर्म होतसें 'भूत' उद्यांचें
भविष्य हो येथें हतबद्ध !

मानव झाला जर का दानव
पाप न कांहीं यांत तयाचें
कुरुक्षेत्र जर पेटे रोजच
नातें कुठलें पति-पत्नींचें !

येथें वस्त्रासाठीं घेती–
माणुसकीची फाडुन चिंधी
तर का व्हावी प्राप्त जगीं या
पुण्याईला ऋद्धी-सिद्धी !

संसाराच्या संस्काराला
रोज चालले तडे तटातट
कुरुक्षेत्रावर पहात बसला
आश्चर्यानें स्तंभित अच्युत !

●

# रात्र

किती नाचलीस तरी
सारा उसना दिमाख
तुझें कांहीं नाहीं यांत
सारें दुसऱ्याचें सुख!

फिदिफिदी हसलीस
म्हणून का मी फसेन!
तुझ्या घरांत असून
तूं ग, नाहीस धनीण!

प्रकाशतो वेगळाच
त्याचें आगळेंच तेज!
याचें दान, त्याची ओटी
अशानें का झाके लाज?

उगीच का नाचतेस
त्याची वळतांच पाठ
प्रकाशाच्या प्रकाशांत
किती राहशील ताठ?

चंद्र बिचारा सालस
आणि मनाचा कोमल
ऋण काढून पुरवी
तुझे लाड चवचाल

किती छळतेस तरी
खंगतो तो कणकण
आणि मग मात्र तुझी
पाहतों मी दाणादाण!

●

दा. क्र. ९२९४

# सत्य

चांदण्यांतल्या काळ्या छाया
चंद्र बघाया लोळण घेती
केव्हां इकडे केव्हां तिकडे
अशी चालते दंगा-मस्ती.

कधीं तपस्वी होउनिया मग
झाडाखालीं धरिती शांती
रूप आपुलें पाहत आपण
बद्ध मनानें चिंतन करिती.

आणि उगीचच करिती कुजबुज
धरणीच्या कानाशीं बिलगुन
गगनामधलें तेज पहाया
बघती कांहीं वशिला लावुन.

ती धरणी तर लबाड मोठी
हसते वळतां त्यांची पाठ
अन् चंद्राला निरोप देते
जुळवुन अपुले दोन्ही ओठ.

चंद्रहि हलके लांबवुनी कर
घाली धरणीसंगें पिंगा
छाया घेती लोचन झाकुन
कुणी न ऐके त्यांचा दंगा !

●

## शाप

नसता जर का या विश्वावर
माणुसकीला कसला शाप
घजला नसता मानव पुढती
करावयाला कसलें पाप.

सूर्यामागें नसती लपली
रात्र झाकुनी अपुलें तोंड
कलंक नसता चंद्रालाही
फुटलें नसतें त्याचें बेंड

सुखांत नसती उणीव कांहीं
कोणी नसते लपले कोठें
गुलाब खुडतांना कधिं हातीं
मवेंच आले नसते कांटे.

भावभावना स्वप्नामध्यें—
नसल्या बसल्या सुख आकारित,
मनामनांचें द्वंद्वहि नसतें;
नसते डोळे बसले चाटित !

माणुसकीला शाप देउनी
परंतु गेला कोणी वेडा
सहज घातला इथें तयानें
सुखदुःखांना एकच वेढा !

●

# मी तुझीच सतार

तूं वादक–, मी तुझीच सतार
जशी लहर तव तसाच माझा
उठेल स्वर झंकार!

जरा स्पर्शितां मला तुझे कर
जुळतिल अपुले दोघांचे स्वर
तुझिया स्पर्शासाठीं झुरते
माझी तार न् तार.

तूं हृदयाशीं घेतां बिलगुन
फुलून येई माझा कणकण
वाटे मजला हवाहवासा
तुझा स्पर्श मिळणार.

जीवन माझें तुझ्याच हातीं
सदैव दे तूं तुझी संगती
तूं नसतांना बोल मनांतिल
कसे कुणा कळणार!

तुझे दोन कर अन् माझे स्वर
उभवतील रे, स्वर्गहि भूवर
स्पर्शित पडदा, उठवित दिड्दा
रमवूं हा संसार

तूं वादक–, मी तुझीच सतार!

●

# वैजयंती

वैजयंती मी, रुळे वक्षीं प्रभूच्या सारखी
माझियावांचून त्याला ना कुणीही लाडकी !

मी प्रभूला जिंकुनीया पूर्ण केलें अंकित
आणि माझ्या सौरभानें तोहि हो उल्हासित
केवढें हें भाग्य माझें, केवढी ही लायकी
माझियावांचून त्याला ना कुणीही लाडकी.

जन्मलें वृंदावनीं मी भाग्यवंताच्या कुळीं
श्रीहरीची थोरवी तेथेंच कानीं ऐकिली
आज वाटे जन्म माझा लागला हा सार्थकी
माझियावांचून त्याला ना कुणीही लाडकी.

रूप देहाला न माझ्या रंगही हा सावळा
गंध माझ्या अंतरींचा मी उरीं जोपासला
त्या मलाही स्थान देई तो उरींच्या मंचकीं
माझियावांचून त्याला ना कुणीही लाडकी.

ज्या गळां देवा, तुझ्या मीं हात माझे गुंफिले
त्याच हातानें तुला हें सर्व माझें अर्पिलें
तूं दुरी सारून आतां ना करावे पारखी
लाडकी मी,—होय ना ? हा हट्ट माझा ऐक कीं !

●

# आज वर्ष बदललें

आज वर्ष बदललें, पर्व-पान उलटलें
कालच्यापुढेंच आज काळ टाकि पावलें

दिवस कालचा जुना
तो न यायचा पुन्हा
सूर्य आज उगवतांच भूत-राज्य संपलें !

आज यायचा हुरूप
घेउनी नवीन रूप
स्वागतास विश्व त्यास दशदिशांत हासलें.

आजचें नवेंच गीत
जन्म घेइ गात गात
काळजांतल्या कळांत रक्त-काव्य तापलें !

भग्न स्वप्न कालचें
आज मूर्त व्हायचें
आकृती रचावयास तेजबिंब ओतलें !

ऊठ मानवा, अजून
पाहिं तूं जगिं हसून
आज हे घराघरांत ध्वज नवे उभारले.

●

# आहेस ईश्वरा, काय ?

आहेस ईश्वरा, काय अजून जगांत ?
कीं हें जग करितें आज तुझ्यावर मात ?
मज कळे न कांहीं यांतिल सत्य-असत्य
मी अजाण म्हणुनी मज हें कोडें नित्य !

तूं क्षमाशील अन् दयानिधी जर देवा,
तर पाप्यांनींही कां न करावा हेवा ?
हें जाणुन करिती पापी जर का पाप
तर त्यांना तरि का व्हावा पश्चात्ताप ?

डोळ्यांत फेकुनी तुझ्या कधीं रे, धूळ
तुज तुझे पुजारी देती कांहीं भूल !
अन् पुण्य कोणतें, कुठलें यांतिल पाप
हा संभ्रम पडतो तुजला आपोआप !

कधिं तुला वाटतें ( असें मला हें वाटे )
कीं गुलाब जेथें तेथें असती कांटे
अन् म्हणुनी का कुणि लावित नाहीं रोप
जर फूल दरवळे त्यांतुन आपोआप !

—पण गुलाबास जर बोंचुं लागले कांटे
तर फुलावयाला फूल कशास हवें तें ?
जर ज्याला अपुलें जिणें मिळे न जगाया
तर मांडिलास कां जगीं पसारा वाया ?

जी श्रद्धेमधुनी जन्मा यावी भक्ती
ती भक्ती नसते–ती तर रे, आसक्ती
अन् प्रीतीवरतीं होतें केव्हां सक्ती
तर सत्यापेक्षां श्रेष्ठ इथें हो युक्ती !

हें बघतों आहे घडीघडी मी रोज
मज बघतां बघतां मनांत वाटे लाज,
तें सत्य कुठें तव, पुण्य कशास म्हणावें
या जन्मामध्यें जें न फळास दिसावें !

ना मानवहृदयीं देव मुळीं उरलेला
कीं देवा, तुझ्यांत मानव जागा झाला ?
–पण माणुसकीला तरी जगांत जगूं दे
रे देवा, अजुनी कर हें जग तूं सिधें !

●

# चंद्रावरतीं झांकण घाला

‘ चंद्रावरती झांकण घाला,
चंद्रावरती झांकण घाला ’
ऐकुन तुमचा असा गलबला वेडे म्हणती लोक तुम्हांला !

तुम्हां न साहत तेज शशीचें
तुम्हां न कौतुक त्या तेजाचें
शीत चांदणें हें चंद्राचें जाळी तुमच्या अंगांगाला !

या चंद्राच्या शीतल किरणीं
थुइथुइ नाचे चंदाराणी
पुसे न येथें तुम्हांस कोणी जो तो रिझवी ज्याचा त्याला

रम्य रुपेरी शीतल सागर
पहा भूषवी धरणी-अंबर
सुखद तुम्हांला झोप निरंतर म्हणुनी चंद्र नकोच तुम्हांला

कर्में तुमचीं अंधारांतिल
नकळत कोणा चुकुनी कळतिल
आणिक पापें उघडीं होतिल यासाठीं का नाच चालला ?

चंद्र चांदणें आला घेउन
जाणारच तो प्रकाश ओतुन
तुम्हां नको तर घ्या मुख झांकुन हात लावुनी स्वतः कपाळा !

चंद्र नभींचा झांकायाला
अजुनी नाहीं शोध लागला !

●

# मनीषा

मी लिहितों तें वाचायाला
हवेत गे, तव वत्सल डोळे
माझें कौतुक करावयाला
शब्द हवे तव ओठामधले.

धन्य वाटुनी फिरवावा तूं
माझ्या पाठीवरुनी हात
त्या हातांतिल तव संजीवन
करील माझें जीवित सार्थ.

तुझ्याच प्रेमळ वात्सल्याची
मनास माझ्या या आसक्ती
तुझ्याच आशीर्वादामध्यें
माझी सगळी आहे स्फूर्ती

माझी कीर्ती ऐकत ऐकत
तव कानांची व्हावी तृप्ती
कूस उजवली तुझी म्हणुन मी
तुला मिळावी मनास शांती

जीवित हें बघतां तव व्हावे-
कृतार्थतेनें लोचन ओले
हीच मनीषा तुझ्या मुलाची,
आई, मागूं काय निराळें ?

●

# वर्षा

आज हवेच्या कंठामधुनी
लकेर आली वसुंधरेची
जलाशयाला ओळख पटली
आकाशींच्या श्याम घनाची

मेघामागें लपले हासत
रविबिंबाचे तेजस्वी कर
वसुधेच्या या गर्भामधुनी
उमलायाचे कोमल अंकुर

श्वास सोडला ऊनऊनसा
ग्रीष्मानें हा सरता सरता
फुलावयाची हिरवी राणी
लेउन तारुण्याची नवता !

आज हासती अवखळ वारे
हसते बिजली नभांत वरतीं
मेघ यायचे नाचत गर्जत
घालाया कर वसुधा-कंठीं !

## जाणीव

तुझ्यांत असुनी तुझ्याहुनी पण–
थोडासा मी हवा वेगळा
नाहींतर मग कळो न येइल
‘ मी ’ हा कुठला ‘ माझ्या ’ मधला!

अपुल्या दोघांच्या श्वासांचें
जरी जाहलें अपूर्व मीलन
तरिही मजला हवें कळाया
माझ्या हृदयामधलें स्पंदन

मला बघावें मीं तव नयनीं
माझ्या नयनीं तुजला बघ तूं
हवीच जाणिव परी मनाला
तुझ्यांत मी अन् सखि, माझी तूं!

तुझिया अधरीं लहरत यावें
माझ्या ओठांमधलें गाणें
कळा हव्यातच कळावयाला–
आपण आहों दोन दिवाणे!

तूं आणिक मीं यावें जवळी
मुळीं नुरावें कशांत अंतर
वाऱ्यालाही नकोच जागा
घालायाला कोठें फुंकर!

परी कळाया तुला-मला कीं...
झालें आहे अपुलें मीलन
थोडासा मी हवा वेगळा
तुझ्यांत असुनी तुझ्याहुनी पण!

●

# तुझे हात

जिथें तिथें या घरांत
तुझे हात फिरतात
याच अभिमानामधें
फुलतों मी हृदयांत.

तुझ्या कंकणांचें गीत
गाती शब्द सुगंधित
आणि त्याचा परिमल
घुमे कानाकोपऱ्यांत.

कानाकोपरा घराचा
तुझ्या हस्तस्पर्शासाठीं
तळमळे माझ्यासम
तुझ्यापाठीं–तुझ्यापाठीं !

कुरवाळिसी ही जागा
सखि, रोज दिन-रात्रीं
माझ्या घराचें कौतुक
आहे तुझ्या उभ्या गात्रीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 22083 वि:
क्रमांक 9.3.65 नों: दि:

किती प्रसन्न ठेविसी
रोज माझें घरकुल,
माझ्या मनाचा आल्हाद
तुझ्या करांचा हा खेळ.

पसारा मी घालतां हा
आवरिसी तूं हासत
तेच हात पकडून
स्वप्न पाहतों निवांत !

●

# ओवी ओवायाची तर

ओवी ओवायाची तर
ज्ञानेशाच्या बागेंतील
हवीं शब्दांचीं सुमनें
ज्यांचा मंद परिमल
अजूनहि दरवळे !
अजूनहि दरवळे !
शारदेच्या मंदिरांत
सरस्वतीच्या गळ्यांत
तीच ओवी घुमतसे
गंध भोंतीं उधळित.
ओवी ओवायाची तर
हवी प्रासादिक घुटी
हवें माधुर्यांचें लेणें
अच्युताची हवी शक्ति !
चंद्रबिंबाकडे जशी
चंद्रमणी घेई ओढ
तसे ओवीच्या सूत्रांत
हवे अंतरींचे कढ !
ओवी ओवायाची तर
हवी अमृताची वाणी
निवृत्तीची हवी कृपा
हवी भावनांची गोणी !
ओवी ओवायाची तर
आज हवे ज्ञानेश्वर
मग घुमतील शब्द
घरोघरीं ओठावर.

●

# किनारा

त्या वाटेला अजुनी वाटे
घ्यावे माथ्यावरतीं ऊन
पायाखालीं अंथरुनी तन
व्हावें आपण जगांत पावन.

त्या वाटेला अजुनी वाटे
न्हाउन व्हावें ओलें चिंब
आणि शहारावा बांधावर
रसरसलेला ओला निंब.

त्या वाटेला अजुनी वाटे
जरा जुईची घ्यावी छाया
सुवास घेउन यावा वारा
अंबाड्यावरतीं माळाया.

त्या वाटेला अजुनी वाटे
घ्यावी हिरवळ खांद्यावरतीं
आणि चांदणें वेंचित जावें
ओल्या चंद्राच्याही पुढती !

त्या वाटेला केव्हां वाटे
काळोखाचा हवा किनारा
मंथन झालेल्या शरिराला
तोच तेवढा देइल थारा !

●

## उमल हळुहळू

उमल हळुहळू प्रकाश-कमला
तव तेजाचा गंध निराळा

सुवर्णकांती तुझी मनोहर
आणि प्रभेची रम्य प्रभावळ,
तेजस्वी पण दिससी कोमल
मंद उषा-स्मित ये देठाला

भोंतीं उधळुन प्रकाश अपुला
निघालास तूं कुठें पुजेला ?
पुष्प पूजिते काय फुलाला
प्रकाश द्यावा कुणी प्रभेला ?

या तेजोमय कळीकळींतुन
प्रकाशास तूं दिलें निमंत्रण
तेजोगंधा, तुझेंच पूजन–
हवें कराया या विश्वाला !

●

# बिलगती

कविता मी लिहितांना
पाठीमागें रेंगाळत
हवीस तूं बिलगून
केंस माझे खेळवीत.

तुझ्या लोचनीं पाहतां
न्याहळून माझें रूप
हवेंस तूं बिलगाया
मला द्यावया हुरूप.

कुरवाळतां मी कधीं
तुझे बिल्वरांचे हात
बिलगून गुंफावास
कर-हार या गळ्यांत !

कधीं कधीं असावेस
ओझरते बिलगत
आणि कधीं पळावेस
बिलगून अलगद.

बिलगता-स्पर्श तुझा
माझें मन पालवेल
तुझ्या माझ्या संसारांत
फुलवील फुलवेल !

●

# हसलें असतें ऊन जरा तर

हसलें असतें ऊन जरा तर
इतकी तप्त न होती धरणी
नाचत-गुंगत फिरली असती
अग्निकरांना हातीं धरुनी

आणिक पडली नसती लोळत
सोडित दीर्घ उसासे विरही
तिच्यासवें या सुंदरतेची
नसती झाली लाही लाही!

पहाट भोळी नसती सुकली
काढुन वर क्षितिजांचीं हाडें
असंभवाला पडलें नसतें
भवितव्याचें वेडें कोडें!

ऊन हसावें परी कसें पण
सोडुन अपुला स्वभावधर्म?
वसुधा जाणुन जगते आहे
उन्हांतलें या जीवन-कर्म!

●

## ज्वालामुखी

मी जळतों, मी जळतों
जळण्यांतच मी जगतों
तेजांतच मी फुलतों
लाव्हांतुन मी स्रवतों

विश्वाच्या आगींतच
तळमळतों तडफडतों
भूमीच्या गर्भांतुन
हिंदळतों वादळतों

आगीच्या दाहांतच
देहाला जोजवितों
तेजानें जगण्यास्तव
मी मजला भस्मवितों

तेजाचा मी तर कण
तेजाचें मज भूषण
जीवन मम एकच क्षण
त्यासाठीं पण जळतों

क्षण एकच तेजाचा
क्षण एकच जगण्याचा
तो मजला मोलाचा
स्वर्गाहुन प्रिय गमतो !

●

# स्वागत

किमया तुझिया अस्तित्वाची
मोह घालिते मला सदोदित
मनांत किंवा जनांत येसी
साकारुन कधिं, केव्हां अस्फुट !

कधीं चांदणें होउन येसी
दावायाला अधीरसें स्मित
वसंतशोभा घेउन येसी
कधीं फुलांच्या मागुन हासत

सौंदर्याच्या वर्षावानें
या सृष्टीला केव्हां खुलवित
मानवतेच्या नसांनसांतुन
येसी केव्हां विकास शिंपित !

वाऱ्यांच्या वेगांत कधीं तूं
गती होउनी जासी गुगत
केव्हां सूर्याच्या तेजांतच
रूप दाविसी प्रसन्न अद्‌भुत !

केव्हां कोमल, केव्हां निर्दय
परंतु अंतीं तूं तर शाश्वत
अशा तुझ्या या अणुरेणूंचे
करायचे मज हासत स्वागत

●

# माला

चांदण्याची मऊ साय
होती वाऱ्याच्या बोटांत
तीच फिरविली त्यानें
जगावर अलगद

आणि हासला खट्याळ
गगनांत शुक्रतारा
पहाटेच्या कानामधें
हळू कांहींसं बोलला

ऐकतांच त्याचे बोल
पहाट हो गोरीमोरी
लपवाया गेली पण
उमटली लाली गालीं

चांदण्याचें झालें भोंतीं
अचानक दंहिवर
आणि बसलें येऊन
कळी-पाकळीच्यावर !

पहाटेला उमगेना
काय शुक्र जें बोलला
चंद्रकरांनीं घातली
दंवबिंदूची ही माला

●

# पंख माझे पसरले

आज अचानक मीच
पंख माझे पसरले
आतां ध्यास उडण्याचा
स्वप्न हवें हवेंतलें

उंच उडण्याचें वेड
आतां लागलें मनाला
पिसारा हा पसरला
जरा राहूं द्या मोकळा

बांधलेल्या पंखामध्यें
नाहीं कळो आलें बळ
दिसतसें आज डोळां
पुढें विशाल आभाळ

आहे जीवन विशाल
नाहीं आकाशाला अंत
उडणाऱ्या विहगानें
बाळगावी काय खंत ?

पंख आतां पसरले
आवरावे कसे पुन्हा
गगनाला गवसणी
घालायाची हा न गुन्हा

●

# माला

चांदण्याची मऊ साय
होती वाऱ्याच्या बोटांत
तीच फिरविली त्यानें
जगावर अलगद

आणि हासला खट्याळ
गगनांत शुक्रतारा
पहाटेच्या कानामधें
हळू कांहींसं बोलला

ऐकतांच त्याचे बोल
पहाट हो गोरीमोरी
लपवाया गेली पण
उमटली लाली गालीं

चांदण्याचें झालें मोतीं
अचानक दंहिवर
आणि बसलें येऊन
कळी-पाकळीच्यावर !

पहाटेला उमगेना
काय शुक्र जें बोलला
चंद्रकरांनीं घातली
दंवबिंदूंची ही माला

●

# पंख माझे पसरले

आज अचानक मींच
पंख माझे पसरले
आतां ध्यास उडण्याचा
स्वप्न हवें हवेंतलें

उंच उडण्याचें वेड
आतां लागलें मनाला
पिसारा हा पसरला
जरा राहूं द्या मोकळा

बांधलेल्या पंखामध्यें
नाहीं कळो आलें बळ
दिसतसें आज डोळां
पुढें विशाल आभाळ

आहे जीवन विशाल
नाहीं आकाशाला अंत
उडणाऱ्या विहगानें
बाळगावी काय खंत ?

पंख आतां पसरले
आवरावे कसे पुन्हा
गगनाला गवसणी
घालायाची हा न गुन्हा

●

# उगीच

उगीच होतें मन उल्हासित
उगीच होतों पुलकित कणकण
जाणिव होते उगीच केव्हां
घडलें नसतां कांहीं कारण.

उगीच घेतों वास फुलांचा
( विलायती वा बिनवासांची )
शीळ घालतों उगीच केव्हां
जुळवुन काव्यें ओठावरचीं

टिचक्या खेळत बोटांशीं मीं
उगीच रमतों कधीं कधीं तर
कारण असतें, कारण नसतें
मनास येतो उगीच मोहर.

अर्थ अशा या कृतींत असतों
उगीच कोठें थोडा थोडा
त्या ' चंदी 'वर दौडत जातो
मनोरथाचा वेडा घोडा.

●

# स्मित

खूप दिवसांनीं होतां
तुझी-माझी दृष्टभेट
सहजच उधळिले
माझ्यावरतीं तूं स्मित.

तुझ्या स्मिताची मोहिनी
होती कांहींच आगळी
प्रभा भासली संध्येची
मुखावर फुललेली.

तुझ्या स्मितांतून आले
कांहीं लाडिक बहाणे
त्याहि मागें होते जरा
भाव लबाड दिवाणे !

शब्दावांचून हास्यांत
होता किती अर्थ गूढ
पावलेंही खिळलीं अन्
झालों क्षणभर मूढ !

तशा कातरवेळेला
उभी होतीस कंपित
झाली जाणीव जरा तों
स्मित लपलें ओठांत !

वाऱ्यावर जसा जावा
कधीं सुगंध उडून
तसें तुझें मंद स्मित
गेलीस तूं उधळून !

# उषेपरी ये

उषेपरी ये माझ्या दारीं कांचनकर उभवून
आणि माझिया अंधारीं या हसुंदे पहिलें ऊन.

प्रकाश अपुला भंवतीं शिंपित
स्वप्नफुलांना माझ्या फुलवित
वेंच फुलें तूं अंगणांत या चिरशांती होऊन.

मंदस्मिताच्या तुझ्या प्रकाशीं
चढविन मी विभवाच्या राशी
प्रकाशगंधा होउन ये तूं साज नवा लेऊन.

या दारींचें तुझें पदार्पण
भूषवील सखि, माझें अंगण
पहाट-वीणा करील गायन तिथें सूर छेडून

घेउनि हातीं तव कांचनकर
स्वागत करितों उंबरठ्यावर
तुझ्या प्रकाशीं तुझ्यासवें मी जाइन जग लंघून

●

# श्रद्धा

जागत बसली वेडी श्रद्धा
उतरुन भोळ्या ओल्या नयनीं
आणिक दमलेल्या डोळ्यांना
ओढ लागली जाया शयनीं.

श्रद्धेची पण आहे श्रद्धा
अपुल्या निश्चल निष्ठेवरतीं
झोंप न यावी या डोळ्यांना
जरी पापणी दिसते मिटती !

कुणिही यावें आणि करावी
या श्रद्धेशीं डोळे-झाक
काय अर्थ मग त्या शब्दांना
कसली आण नि कसली भाक ?

ईप्सित हातीं ये पावेतों
असते त्यांची निश्चल श्रद्धा
आणिक नंतर होई उलटें,
मोहन शोधित फिरते राधा

भोळीला का आतां गवसे
तिच्यामागचा तिचा पुजारी ?
झालें-गेलें कधींच सारें
डोळे मिटतिल मात्र अखेरीं !

●

# शुक्र हासतो

सुगंध होता कळींत निजला
भिजलें होतें दंहिवर दारीं
धूसर झाली होती मदिरा
अतां निळ्या पेल्यांत रुपेरी.

तिष्ठत होता अजुनी वारा
उल्हासाचें गाया गीत
उरीं काजळी धरुनी होती
समईमधली जळती वात.

जातां जातां त्या रात्रीला
सांगत होती निरोप तारा
पण चंद्राला उचलत नव्हते
जाण्यासाठीं पद मावारा.

नव्हती सरली धुंद तुझी अन्
नव्हती सरली अजुनी रात
अजुनी नव्हत्या दिशा उजळल्या
अजुनी नव्हती पुरी पहाट.

अशाच वेळीं फुलांत होते
फुलत आंतुनी पराग कणकण
शुक्र हासतो उगीच गालीं
आठवतां रात्रीचे ते क्षण.

●

# कशी भुलली पहाट ?

कुणींतरी उधळिले
तिथें प्रकाशपराग
आली पहाटेला जाग.

कसे गुंफिले फुलांनीं
सुवासाचे सुम-हार
अलगद वाऱ्यावर.

कशी कानावर आली
दाट वनांतून शीळ:
कुठें आहे घननीळ ?

निर्झराच्या दर्पणांत
सृष्टि पाहते कां रूप ?
तिचा आगळा हुरूप.

भावकमळें फुललीं
घेऊनिया मनीं ओढ
फुलायाचें त्यांना वेड.

कशी भुलली पहाट
नकळत प्रकाशाला
कोण सोबत रात्रीला ?

•

# दडपण

कां नेलास तो क्षण ?
ज्याचा जन्म तेवढाच होता
ज्याच्यांत विनाश भरून होता
ज्याच्यांत प्रकाश पुरून नव्हता
ज्याचें पुन्हा घडणार नव्हतें
कुठेंच कधींच तसलें दर्शन
कां रंगविलास तो क्षण ?

माझी तृप्ती तेवढ्यांत होती
मला हवी होती
                ती त्याची भक्ति
                त्याची प्रीती
पण तुलाच पहावत नव्हतें
तें क्षणिक सुख
तें क्षणिक सौंदर्य !
चुकूनहि घडलें नव्हतें वेडेवाकडे कांहीं वर्तन
मग कां घेऊन गेलास तो तसला क्षण ?

जरा केशरी रंगांत
रंगत होतें नवें जीवन
घडत होतें नवें दर्शन
चढत होती नवीन शक्ति
मिळणार होती आतां मुक्ति

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता. क्र. ८३८९
शाखा (स्थळ

आणि नाचऱ्या मनालाहि
येणार होते तापस-लोचन.
तूंच ना हात दिलास ?
मग कां घात केलास ?
कां केलीस अशी भुलावण ?

त्यापेक्षां गंधहीन दुःखाचें फूल
कां नाहीं दिलेंस हातांत
त्यानेंच तुझी पूजा केली असती
आणि झालें नसतें
तुझ्यासारख्या दात्याचें विस्मरण
पण दिलीस आणि नेलीस
माझी सुखी आठवण !

तूं समर्थ नाहींस
आणि असमर्थहि नाहींस
तुला हवें आहे
आमच्यावर केवळ तुझें दडपण
म्हणूनच तूं देतोस कण
आणि नेतोस क्षण.

●

# वीज कुठें ती ?

भिरभिरताहे नुसतें वादळ
गिरक्या घेतो हा पाचोळा
गळलीं पुष्पें, पडलीं पानें
हो सगळ्यांचा चोळामोळा.

धुंद जराला गंध फुलांचा
आला आला तों तो गेला
दृष्टीपुढची सृष्टी लपली
आणिक केवळ भासच उरला.

होतें त्याचें नव्हतें झालें
बघतां बघतां नूर बदलला
आणि भोंवरा निर्मुन भंवतीं
गुंतुन घेई वादळवारा.

संधी साधुन असली नामी
येथें तांडव घाली धूळ
चुरगळलें हें पायाखालीं
सुस्थिरतेचें कोमल फूल.

या वाऱ्याच्या अंगावरतीं
अंधाराची काळी जाळी
वीज कुठें ती लखलखणारी
अशी अचानक आज हरवली ?

●

# प्रतीक्षा

निळ्या-निळ्या साडीमधें
संध्या होती सुरकत
गुरु-शुक्राचे लोलक
होते कानांत डोलत.

रविबिंबाचा तिलक
होता रेखिला ललाटीं
क्षितिजाच्या उंबऱ्यांत
होतीं पावलें गोरटीं !

आणि सावरीत होती
सप्तरंगाचा पदर
इंद्रधनूचें लावण्य
अंबराच्या कांठावर.

भुरुभुरु बटांतून
रातराणीचा सुवास
अंधाराला भिववितो
तिचे काळे काळे केस.

व्याकुळ ही चंद्रमुखी
वाट पाहते दारांत
तोंच चंद्रानें झाकले
तिचे लोचन लपत.

# पहा एकदां तरी

पहा एकदां तरी येऊन
आणि घ्यायचें तें जा देऊन
        तुला नाहीं मागणार
        जें न मला झेपणार
परी एकदां खुशाल ओत
माझ्यावरतीं प्रकाश-झोत
कदाचित तें तेज साहीन
पहा एकदां तरी ओतून
फेकून पहा तूं भोंवऱ्यांत
न जाणो तूंच होशी चकित
        माझ्या बाहूबलावर
        येईन मी कांठावर
देशील तेथें आपुला हात
ज्यांतून देशी सदा अमृत
तोहि मान मी शिरीं वाहीन
पहा एकदां तरी फेकून
नसेल तुला पुरें ठाऊक
मीच लायक, मीच लायक
        कसें माझिया मुखानें
        मीच गावें माझें गाणें
प्रश्नाविण का द्यावें उत्तर
नाहीं गुलाब, नाहीं अत्तर
फूल जाईल मात्र सुकून
पहा एकदां तरी हुंगून

●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
मैफल
अनुक्रम 22083 वि: काव्य
क्रमांक 93८५ नों: दि

अष्टदिशांच्या या भिंतींना
    हवा उषेचा फिक्कट रंग
विहगांनीं अन् सुरांत गावा
    उत्साहाचा एक अभंग

वायूच्या झुळुकेनें जावें
    झाडुन दारापुढलें अंगण
प्राजक्ताच्या मंद फुलांनीं
    घालावी त्यावरतीं पखरण

सूर्य-मयूरानें मग यावें
    उभवित अपुला तेज-पिसारा
मनोरथांतिल आकांक्षांनीं
    पुढें पिटावा त्यांतें नगारा

रंगुन जावी येथें मैफल
    या दूर्वांच्या गालिच्यावर
अन् डोळ्यांनीं जरा बघावें
    जगांतलें या वैभव सुंदर!

## क्षमा ती असावी

तुझ्या पावलांचे पदाघात सोशीत
हिंडें पहा मी किती सारखी
परी मानवा रे, कधींही न झालेंच
सेवेंत केव्हां तुझ्या पारखी !

सतीहून निष्ठा पतीच्या ठिकाणीं
असें एक माझीच ही निस्तुला
तरी खंत ना खेद कांहीं कुणाला
जगीं मोल मातीहुनी ना मला !

चुका सावराव्या तुझ्या सारख्या मी
भुकाहि तुझ्या भागवाव्याच मी
सुखीं तूं रहावास या मर्त्यलोकीं
म्हणोनी फिरे भिंगरी होउनी !

तुला स्फूर्ति, शक्ति सदाची मिळाया
रवीच्या प्रकाशांत नेतें तुला
तशी झोप याया तुला स्वस्थ चित्तें
हळू बोलवीतें इथें रात्रिला !

मिळावें तुला पीक-पाणी जगाया
अशा भावनेनें सदा सेवतें
हिरे-माणकांची नको वानवा ती
म्हणोनी तयांना उरीं पाळतें

कुठेंही तुवां घाव घालून घ्यावें
तुला जें हवें तें—परी ना रडें
जरी छिन्नविच्छिन्न केलेंस मातें
तरी साहतें मी तुझे कोरडे!

तुझी हाव अन् भूक ही वाढताहे
किती काळ सेवेंत राहूं बरें ?
उरीं श्वास माझ्या पहा कोंडताहे
कसें सांगुं ये केधवां कापरें !

उरीं मत्त लाथा तुझ्या सोशिल्या या
नुरे शक्ति, मी होय कम्पाकुला
कुणी गाडले मात्र गेलांत केव्हां
क्षमा ती असावी मला भूमिला !

# शिखर

मंदिराच्या कळसाचा    मला लाभला हा मान
भाविकांची लोटे रीघ    रोज घ्यावया दर्शन

दिन-रात पाहतों मी    दूरवरचें सौंदर्य
छत्र झालों देवावरीं    आणि भोगतों ऐश्वर्य

देवापाशीं थेट कुणी    कधीं जातात गाभारीं
पायरीला स्पर्शून ते    कुणी जातात माघारीं

कितिकांचे पाय रोज    लागतात मंदिराला
कितिकांचे नमस्कार    दुरूनच येती मला

येती जन, जाती जन    कधीं चालतो गोंगाट
अशा प्रकारें उडतो    माझ्या भोंवतालीं थाट

पण नाहीं माझ्यापाशीं    कधीं कुणी फिरकत
देवाघरीं मात्र माझी,    भाविकांशीं फारकत

मंदिराच्या कळसाचा,    मला लाभलेला मान
हाय, दुरावलों जनां    अग्रस्थानही लाभून !

# गीत

वसुंधरा गाते आहे
आकाशाचें निळें गीत
आणि याचितें मनांत
हवा प्रकाशाचा हात.

कधीं वाटतें हिंडावें
दिमाखांत जनांतून
चार चौघांनीं पाहावें
जरा मान मुरडून

म्हणुनीया धांवते ती
सदा रवीच्या शोधांत
तेजोवसना होऊन
मिरविते ठुमकत

मोहविते नारायणा
भोंतीं धरूनिया फेर
आणि प्रकाशगर्भेचा
अभिमानें फुले ऊर !

पण येतां सदनांत
लावितसे चंद्रदीप
मंद प्रकाश प्राशीत
घेतें गृहिणीचें रूप.

इथें चंद्र, तिथें तारा,
उरीं प्रकाशाचा हिरा
तसे पहाऱ्यास भोंतीं
नक्षत्रें नि ग्रह बारा !

काळोखाच्या पडद्यांत
पहुडते रंभा-राणी
मग शयनघरांत
करी स्वप्नांची जुळणी

ओठावर मात्र तिच्या
सदोदित निळें-गाणें
"एको देवा केशवा" ती
आकाशाचें गीत म्हणे !

## विडा

पिवळी ओली हसली कर्दळ
अत्तर घेउन गुलाब फुलला
आणि लतांच्या कुशींत बिलगत
अलगद अलगद आला वारा.

अमरांनाही जरा वाटलें
जावें चुंबित ही रसवंती
दंवबिंदूच्या शालीखालीं
हिरवी हिरवळ लाजत होती.

धमवित होता अपुला तोरा
दूर जरासा तो प्राजक्त
देउ जाहले होते त्याचे
थोडेसे पुलकित आरक्त.

पाहुन वसुधेचें हें स्वागत
नारायणही झाला वेडा
चघळूं लागे विडा उषेचा
तोही नकळत थोडा थोडा!

●

# उघाडिलें तुलाच दार

उघडिलें तुलाच दार
मध्यरात्र जागवीत
घालवीत भावगीत
छेडितें इथें सतार.

चाललीं फुलें सुकून
हाय, गंध जाय विरुन
घालुं मी कुणास हार ?

चंद्र वांकला वरीं
सरत येइ शर्वरी
यायची अतां सकाळ.

सांग सांग दिलवरा
यायचें कधीं घरां
विरह केंवि संपणार ?

●

# कशी येउं मी !

कशी येउं मी चंद्रकरांतुन
तशांत माझ्या पायीं पैंजण.

ऐकूं येई शीळ तुझी ती
परी उरीं या अबोध भीती
अजुनी जागे विश्व सभोंतीं
बघतिल मजला त्यांचे लोचन.

माझ्या देहाचें या लेणें
भूषवितां चंद्राचीं किरणें
चुळबुळ करतिल हिरवीं रानें
पाचोळा मग करील नर्तन.

थांब जरासा तूं घननीळा
आतुर दोघे जरी मीलना
चंद्र होउं दे थोडा कलला
शृंगार तुला माझा वाहिन !

# नवी वाट काढूं

कुणा पूर्वजांनीं कधीं निर्मिलेला
असे राजरस्ता पदें टाकण्याला
किती पावलें वंद्य येथून गेलीं
कितीदां तरी भूमि ही धन्य झाली.

निराळे निराळे ठसे पावलांचे
कळेना कुणाला कुठें ते स्वतःचे!
खडा अन् खडा यांतला ओळखीचा
परी पूर्वजांच्या असे हा श्रमाचा.

जसे चालले येथुनी थोर कांहीं
तसे नीच-सैतानही चालले ही
किती धावले आंस ठेवून गांठी,
कुणा वाटले चाललों वाळवंटीं.

किती ठोकरावें धुळीच्या कणांना
तयांच्या पुढ्या वाकल्या आज माना
तिथें 'आ' करोनी किती धूळ खात
पहा अन्य धोंडे सदा लोळतात.

नवें काय आहे अतां याच मार्गी ?
पुन्हा तींच झाडें, पुन्हा तीच गर्दी
सदा ऐकिलें जें, सदा पाहिलें जें
तयाहूनि नाहीं कुठें कांहिं ताजें !

अशा याच मार्गांतुनी चाललों मी
परी वाटती पाय माझे निकामी
पुरा वीट झाला इथें चालण्याचा
नवी वाट काढूं जरी त्यांत खाचा !

## कोरांटीला पदर अडकला

कोरांटीला पदर अडकला
काय म्हणावें या फांदीला !

लबाड तीही तुझ्यासारखी
तिला वाटते तव आपुलकी
लपवाया तव गोडशी चुकी
फितूर झाली ती तर तुजला.

आतां कुठलें तें जलसिंचन
घडा कटीचा दे तूं ठेवुन
काय लपविसी आम्हांपासुन
जातों आम्ही उशीर झाला.

तूं जर अमुची सखी जिवाची
कां न कळावी साद मनाची
बाधा झाली तुज मदनाची
लवकर ये पण पर्णकुटीला.

●

# श्रावणधार

मी आलें श्रावणधार
नकोस ग्रीष्मा, फेकूं अपुल्या नेत्रांतुन अंगार.

रवितेजाची प्रखर आग ती
झेललीस तूं अपुल्या माथीं
अंग-अंग तव जळत राहिलें साहत तेज-तुषार

भवितव्याच्या रेखित रेघा
तुझिया पायीं पडल्या भेगा
तुझे उसासे माझ्या श्वसनीं आदळले अनिवार.

तुझियामागुन होतें धांवत
घेउन मी पाण्याचे हे घट
ठाउक होतें धैर्य तुझें मज, जरि तूं बेदरकार!

घामानें बघ किति डबडबसी
आणि जलास्तव व्याकुळ होसी
अशी तुझी ही रीत सदोदित करिते मज घायाळ.

सचैल घे तूं आतां न्हाउन
हवें तेवढें घे जल प्राशुन
तुझिया सेवेंतच माझें हें जीवन हो साकार.
मी आलें श्रावणधार.

## रावा

गती घेउनी काळ निघाला
पळापळांचे धोंडे तुडवित
किती योजनें आला चालुन
जायाचा परि असाच दौडत.

त्याच्यासंगें खेळत आहे
निसर्गलीला–, पण ना कौतुक
अवतीं–भवतींच्या विश्वाच्या
सुखदु:खाची नाहीं पारख.

वाटेवरतीं येउन त्याच्या
कुणी थांबवा, कुणी पुकारा
एकच त्यानें मंत्र घोकला :
मना, थेट तूं चाल पुढारा !

काव्य कळेना, अर्थ मिळेना
असेंच त्याचें जीवन-गीत
त्याला निंदा किंवा वंदा
पुढें चालला तो मिरवीत.

जगांत राहुन, जग अव्हेरून
खुशाल दावी अपुला तोरा
जलांत असुनी माशांचा हा—
वैरी आहे पुनश्च कोरा!

कधीं न याच्या मनांत आलें
घ्यावा घडिभर कुठें विसावा
घेत चालला गरुड-भरारी
अमूर्त रंगित प्रफुल्ल रावा!

# पाझर

पाझर फुटला पाषाणाला
तर ये त्यांतुन झुळझुळ पाणी
आणिक कळतें केव्हां केव्हां
फत्तरासही असते वाणी.

त्या वाणींतच असतें जीवन
ओलावाही होतो ओला
वरवरचा तो काळा कातळ
ठरतो कारुण्याचा गोळा.

अनुमानांना डावलणारे
भाव घालती उलटे कोडें
अशक्यतेला शक्याचेंही
केव्हां केव्हां पडती वेढे !

●

# जाग

ठेच लागली जातां जातां
त्या चंद्राला क्षितिजावरतीं
भळभळणारें रक्त उडालें
प्राचीच्या मुखकमलावरतीं

तेज-घटांतिल दूध प्राशुनी
सूर्य निघाला पसरित ओंजळ
हिरव्या पानांच्या झोल्यावर
झोके घेते मंजुळ किलबिल.

अशा सुगंधी स्वप्नामधुनी
पहिल्या प्रहराला ये जाग
पाहत पाहत पुढची घटका
घेतें आवेगानें वेग !

●

# माझ्या कविते !

माझ्या कविते, तूं गात रहा.

हृदयामधल्या ज्या भावोर्मी
उठतां-बसतां म्हणती ‘ मी, मी ’
त्यांचीं मुग्ध निरागस गाणीं
तूं आलापित जा, हीच स्पृहा !
माझ्या कविते, तूं गात रहा.

कधिं मी हसतों, कधीं खिजतों
कधिं मी माझ्या मनांत कुढतों
कधीं उमाळे दाबुन धरतों
ते बांध फोडुनी तूं धुंद वहा.
माझ्या कविते, तूं गात रहा.

मनांतली या माझ्या प्रीती
करिते प्रीतीवरती भक्ती
परि लावाया तिची कसोटी
तूं तुझ्यांत माझें रूप पहा.
माझ्या कविते, तूं गात रहा.

दुनिया झुकवित किंवा झुलवित
जेव्हां दौडत जाइ मनोरथ
तेव्हां त्याला दावाया पथ
हो मशाल तूं तेजाळ महा.
माझ्या कविते, तूं गात रहा.

ऊन असो वा असो सावली
कुठेंहि दोघे गाउं कवाली
या दुनियेच्या रंगमहालीं
तूं सम्राज्ञी, मी बादशहा !
माझ्या कविते, तूं गात रहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९३९४
REFBK-0009394
REFBK-0009394

## दोन संगीतिका

( १ ) उर्मिला

( २ ) उषास्वप्न

# उर्मिला

[ सीता व लक्ष्मणासह श्रीराम वनवासास निघाले. त्या वेळीं लक्ष्मणाची पत्नी उर्मिलाहि वनांत जाण्यासाठीं हट्ट घेऊं लागली. पतीचा विरह चौदा वर्षें सोसण्याचें महान् दिव्य त्या सतीला करावें लागलें. त्या नाट्यप्रसंगावर ही संगीतिका आधारलेली आहे. ]

**उर्मिला :**

थोडें थांबा नाथ
येतें मीहि वनांत
श्रीरामासह तुम्ही निघालां
चौदा वर्षें वनवासाला
कशा साहुं या दिवस नि रात्रीं मी तुमच्या विरहांत ?
तुमची सेवा करण्यासाठीं
मला येउं द्या तुमच्यापाठीं
सती सावली असे पतीची प्रेममयी विश्रांत.
आजवरी मी तुमच्या चरणीं
कधीं न केली सख्या, मागणी
पुरवा माझी आस एक ही करुं द्या तुमची साथ
येतें मीहि वनांत

**लक्ष्मण :**

कशाला हट्ट घेसी हा वनाचा उर्मिले, वेडा
सभोंतीं संकटांचा गे, असे रानीं-वनीं वेढा
पतीची सावली म्हणुनी निघाली ही जरी वहिनी
इथें या माय-तातांना दिलासा द्यायचा कोणी ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम .................. वि: ...........
क्रमांक .................. नों: दि: ...............

पुसाया आंसवें यांचीं, चुराया पायही यांचे
रहा तूं उर्मिले, मागें मुखें गा गीत रामाचें !

उर्मिला :

परी कशी ही सेवा होइल
देवा, तुमची या हातून
तुमचे चरण चुरया मिळतिल
कसे मला हो, या येथून ?
अश्रुफुलांनीं पुजावयाची
तुमची मूर्ति काय झुरून ?
विरह-यातना प्रिय रमणीच्या
पाहणार का नेत्र मिटून ?

लक्ष्मण :

तुझ्या नयनींचें पाणी जरि घालिते मोहिनी
संसाराचा वनवास भाळीं आहे तुझ्या राणी !
राघवाच्या सेवेसाठीं माझें वाहिलें जीवन
माझ्या जीवनांत तुझें चुरगाळीं मी यौवन
पण अशा त्यागावर उद्यां उभें रामायण
त्याग आणि वनवास रघुकुलाचें भूषण !
नको बाळगूंस खंत तुझा त्याग महा थोर
तुझें स्थान जिथें तिथें जानकीच्या बरोबर !

उर्मिला :

सांगतां तुम्ही म्हणून नाथ, आज ऐकतें
यातना महान या,–तुम्ही तिथें नि मी इथें !

भोग भोगण्या हवेत जे जसे ललाटिंचें
या वियोग-रेशमांत प्रीत येथ गुम्फितें
त्याग हाच आज भोग मी मनांत मानतें
ईप्सितें मनांतलीं जाणणार जाणते !

**सीता :**

थोर तुझा हा त्याग उर्मिके !
तूंच खरें रामायण रचिलें

पतिसामर्थ्यामागें केवळ
आहे स्त्रीचें त्यागाचें बळ
स्त्रीचें जीवन करुणरसांतिल

परी जगाला रस ना कळलें

कथा रंगल्या ज्या शौर्याच्या
व्यथा ओतल्या त्यांत सतीच्या
इतिहासच हा या विश्वाचा

स्त्री-बळ जेथें तेथें रुजलें !

**उर्मिला :**

आज्ञा प्रमाण यांची मानून येत नाहीं
सांभाळ तूंच यांना भाऊ म्हणून माई !
प्रतिमा उरांतली या घेऊन लक्ष्मणांची
संवत्सरें अशीं हीं चौदा पुजावयाचीं
मी आंवरीत आंसू काढीन काळ सारा
माई, तुझ्याच ओटीं हा प्राण ओतियेला
मी काय आणि सांगूं ना शब्द बोलण्याला
सांभाळुनी सख्या या, भेटायला प्रियेला.

लक्ष्मण :

थोर तुझा हा त्याग ऊर्मिले,
तूंच खरें रामायण रचिलें !

सीता :

थोर तुझा हा त्याग ऊर्मिले, पतिव्रतांचें मंगल गान
तव त्यागावर लिहिलें जाइल रामायणचें पान न् पान !

# उषास्वप्न

उषा :

[ शंकराची प्रार्थना करते. ]

जयजय शंकर, सांब शुभंकर
तुला याचिते जुळवुन मी कर.
छेडित माझी मानसवीणा
तुझी भाकते देवा करुणा
भक्ताची या पुरव कामना
पुजावयाचा मज गौरीहर !

शंकर :

[ प्रसन्न होऊन ]

मी प्रसन्न जाहलों तुझ्यावरी कुमारिके
व्हायचें तुझें अबोध स्वप्न आज बोलकें
स्वप्न पाहतां निवांत
जो दिसेल तुज तयांत
तोच गे, पती तुझा, तयास पूज बालिके !

उषा :

[ आनंदानें ]

प्रभु जे येतिल या दारीं
तयांना पूजिन देव्हारीं
भावफुलांची रम्य प्रभावळ
शृंगारिन मी देव्हाऱ्यावर
त्यांत स्थापुनी माझे प्रियकर
गाइन त्यांची कीर्ति सारी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22073 वि. काव्य
क्रमांक 9365 नोंः दिः 8.8.56

[ चित्ररेखा येते. ]

**चित्ररेखा :**

नीज अतां ग, राजकुमारी
थबकुन बसली गडे, शर्वरी!
वाराही तो पडला आतां
चंद्र हासतो जातां जातां
रम्य मधुरशीं स्वप्नें बघतां
झोंप गडे तूं घे ही दुलई! [ जाते. ]

[ स्वप्न पडूं लागतें. दिवे कमी होतात. अनिरुद्ध येतो. ]

**अनिरुद्ध :**

कशाला तूं मला देवी, इथें बोलाविलें आज?

**उषा :**

हवें का मीच सांगाया, मला वाटे गडे लाज!

**अनिरुद्ध :**

तुला ठाऊक नाहीं का असे मी कोण कोणाचा?

**उषा :**

कुणीही ते असा तुम्ही–असे हा छंद प्रीतीचा!

[ अनिरुद्ध जाऊं लागतो. ]

नका जाऊं गडे, आतां मला सोडून एकाकी
उषा मी आपुली देवा, बसाया मंचकीं या कीं!

[ अनिरुद्ध जातो. स्वप्न संपतें. दिवे लागतात. उषा भानावर येते, चित्ररेखा येते. ]

**उषा :**

पाहिली स्वप्नांत मी ती आज त्यांची आकृती
तेच होते-देव माझे–केवढी त्यांची द्युती!

भर्जरी शेला कटीला सैल होता बांधला
काय सांगूं वर्ण त्यांचा, गौर किंचित् सावळा.
–हाय, ते गेले कसे ग, ना उषेला सांगतां ?
यातनावांचून नाहीं प्रीतिची कां सांगता !

[ थोडा अवधी ]

**चित्ररेखा :**

सांग तरी ते सांग कसे
ज्यांचें जडलें तुला पिसें !
होते का ते कुणी धनुर्धर
सज्ज लावुनी चापाला शर ?

**उषा :**

अंहं॒ऽ नव्हते मुळीं तसे !

**चित्ररेखा :**

सांग तरी ते सांग कसे !
शिरिं होता का मोरपिसांचा
मुगुट तयांचा रत्नमण्यांचा ?

**उषा :** अंहंऽ नव्हते मुळीं तसे !

**चित्ररेखा :** सांग तरी ते सांग कसे ?

**उषा :**

रेख, रेख तूं गडे आकृती
नयनमनोहर त्यांची मूर्ती !

[ चित्ररेखा आकृत्या काढते. काढतांना—]

**चित्ररेखा :**

रेखितें मीं चित्र त्यांचें–सांग तूं हे तेच का ?

उषा :

ते असे नाहींत वेडे, ही न त्यांची नासिका ?

चित्ररेखा :

हे तरी आहेत का ते ? स्थूल कीं ते बारिक ?

उषा :

छे ! न हे ते !–तेज त्यांचें वैभवाचें द्योतक !

चित्ररेखा :

ही तरी आहे गडे, का सांग त्यांची आकृती ?

उषा : [ एकदम आनंदानं. ]

हीच त्यांची अगदीं प्रतिमा
माझ्या आनंदाची सीमा !

चित्ररेखा :

निवड तुझी चुकली,
सखे ग, निवड तुझी चुकली !
नको तिथें तर नकळत तूं ही प्रीती अर्पियली
श्रीकृष्णाच्या यदुवंशांतिल
तुझा गडे, हा आहे प्रियकर
जन्माची गोडी ही सगळी कोड्यांतच पडली !

[ " नारायण, नारायण " नारदांचा आवाज, नंतर प्रवेश. ]

नारद :

चित्ररेखे, सांगतों मी मंत्र आतां ऐक ते
आण जा त्या यादवाला मोहिनीनें या इथें
मंचकीं तो झोपतां तूं घाल त्याला मोहिनी
आणि येथें आण त्याला व्योममार्गें ओढुनी

[ नारद जातात. नंतर चित्ररेखा जाते. ]

मराठी ... ठाणे
दा. क. ९३५४
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

**उषा :** [ सचिंत बसते ]

सांग मना, का मनांत झुरशी ?
आसवांत या भिजे उशी !
तुझें करूं मीं कोठुन सांत्वन
मीही दुबळी करण्या रंजन
प्रतिमेचें या करीत पूजन
किती काळ मी झुरूं अशी ?
आसवांत या भिजे उशी !

[ चित्ररेखा अनिरुद्धाला आणते. उषा लपते. चित्ररेखा जाते. ]

**अनिरुद्ध :**

चुकलों का मी राजमहाल ?
चुकलों का मी आज महाल ?
हे नच ते रत्नांचे दीपक
हा तर नाहीं माझा मंचक
येथें घुमतों कोठें चंपक
इथें छेडितें कुणी सतार

[ उषा पुढें येते. ]

**उषा :**

प्रिया, मी अपुली पददासी
मला घ्या अपुल्या चरणासी !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22083 वि: ...
क्रमांक 9354 नों: दि: 2/1/86


अरुणा
भालचंद्र खांडेकर